Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लियेही
हम जाने जाते है।
9028851719

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451



मंगळवार ०७ ऑक्टोबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : १९८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Tuesday, 07 October 2025 | Year : 5 | Issue : 198 | Daily | Rate: Rs. 5/-

# सरन्यायाधीश गवई यांच्यावर सुप्रीम कोर्टात हल्ल्याचा प्रयत्न

*या घटनेनंतर सरन्यायाधीश भूषण गवई यांनी न्यायालयाचं कामकाज थांबू दिले नाही. त्यांनी कार्यवाही चालू ठेवण्याचे आवाहन केले. भूषण गवई म्हणाले की, 'हे सगळे पाहून कोणीही विचलित होऊ नका. मी देखील विचलित झालो नाही. अशा घटनांनी मला काहीच फरक पडत नाही.*



लोकशाही आणि संविधानाच्या मूल्यांना आधार मानून वाद-प्रतिवादातून न्याय्य भूमिकेकडे जाण्यासाठी न्यायव्यवस्था असते. त्याच न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च संस्थेत मुख्य न्यायमूर्तींवरच अशा प्रकारे हल्ल्याचा प्रयत्न होणे हा केवळ न्यायव्यवस्थेचाच नव्हे तर लोकशाहीचा, संविधानाचा आणि देशाचा घोर अवमान आहे,आपल्या देशात पेरले जाणारे विष आता संविधानाच्या सर्वोच्च संस्थांनाही जुमानत नाही, ही देशासाठी धोक्याची घंटा आहे. ह्या घटनेचा मी निषेध करतो व कोणत्याही परिस्थितीत भारतीय लोकशाहीचे स्तंभ कमकुवत होणार नाहीत, ह्यासाठी कायम प्रयत्नशील राहण्याची ग्वाही देतो.

– शरद पवार

मुंबई : सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर आच सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना एका वकिलाने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. सरन्यायाधीश गवई यांच्या दिशेने बूट फेकण्याचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली. मात्र, या घटनेवेळी सुरक्षारक्षकांनी प्रसंगावधान दाखवत त्या वकिलाला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. या वकिलाचे नाव राकेश किशोर असे आहे. सरन्यायाधीशांवर बूट फेकण्याचा प्रयत्न केल्याच्या प्रकरणी त्याला वकिली करण्यापासून तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. बार काऊंन्सिल ऑफ इंडियाने ही कारवाई केली आहे

'सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही', अशा स्वरुपाच्या घोषणा या वकिलाने घटनेवेळी दिल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, या घटनेवर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी एक्सवर पोस्ट करत या घटनेचा निषेध केला आहे.

## समाजात विष पसरवणारे माथेफिरु :ॲड. रोशन बागडे

**नागपूर :** सनातनचा अपमान सहन करणार नाही असे म्हणत देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर एका वकिलाने कोर्टात बूट फेकण्याचा प्रयत्न केला. ही घटना फक्त न्यायालयासाठी नाही, तर पूर्ण देशासाठी शरमेची बाब आहे. धर्माच्या नावावर उन्माद माजवणारे हे लोक धर्माचे ठेकेदार नाहीत, तर समाजात विष पसरवणारे माथेफिरू आहेत. आज देशात विचार, तर्क आणि संयम यांची जागा धर्मांधतेने घेतली आहे. हा लोकशाही आणि न्यायसंस्थेवर उघड हल्ला आहे. हे सगळं वातावरण काही वर्षात तयार केल्या गेल जे धार्मिक उन्मादाचे बी पेरले, त्याचेच हे विषारी परिणाम आहेत. सरकारला ठाम मागणी आहे की अशा प्रकारे न्यायासनाचा अवमान करणाऱ्या व्यक्तीवर कठोरात कठोर कारवाई व्हावी आणि न्यायव्यवस्थेचा सन्मान अबाधित राहील यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत. असे जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. रोशन रा. बागडे यांनी मागणी केली आहे.



## सर्वोच्च न्यायालयात एका वकिलाने सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्या दिशेने बूट फेकण्याचा प्रयत्न केला

अलीकडेच विष्णू मंदिरासंदर्भातील एका प्रकरणाची सुनावणी करत असताना सरन्यायाधीश गवई याचिकाकर्त्याला म्हणाले होते की 'तुमची तक्रार असेल तर तुम्ही भगवान विष्णूकडे जा.' त्यावर काही लोकांनी, हिंदुत्ववादी संघटनांनी आक्षेप घेत सरन्यायाधीशांवर टीका केली होती. याच वक्तव्याचा संताप व्यक्त करत एका वकिलाने आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी चालू असताना थेट सरन्यायाधीशांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

## न्यायालयाच्या मुख्यद्वाराबाहेर आज निषेध सभा

आज दिनांक 06.10.2025 रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश गवई यांचे बेंच जवळ एका माथेफिरू ने साहेबांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान त्याने घोषणाही दिल्या. हा हल्ल्याचा प्रयत्न म्हणजे माथेफिरूंची सडकी मानसिकता दर्शविते. जिल्हा वकील संघटना, नागपूर सदर हल्ल्याचा प्रयत्नाचा तीव्र निषेध करीत आहे. करिता उद्या दि. 07.10.2025 रोजी दुपारी 2 वाजता न्यायालयाच्या मुख्य द्वाराबाहेर निषेध सभा आयोजित करण्यात आली आहे.

# विशेष संपादकीय

## भारतीय न्यायव्यवस्थेसाठी काळा दिवस
## श्रद्धा, कायदा व न्यायाधिकाऱ्याची स्वतंत्रता

कालचा दिवस भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात काळ्या अक्षरांनी नोंदवला जाईल. सुप्रीम कोर्टात, देशातील सर्वोच्च न्यायिक संस्थेत, एका व्यक्तीने न्यायमूर्तींच्या समोर खिशातून शू टाकला आणि घोषवाक्य दिले 'आमच्या देवांचा अपमान झाला आहे!' सुरक्षा रक्षकांनी त्वरित त्या व्यक्तीला ताब्यात घेतले, मात्र या घटनेने भारतीय लोकशाहीचा कणा असलेल्या न्यायसंस्थेवर थेट हल्ला झाला आहे. ही घटना खजुराहो मंदिरातील भगवान कृष्णाच्या मूर्तीच्या देखभालीच्या हक्कावरून सुरू झालेल्या प्रकरणाशी संबंधित आहे. याचिकाकर्त्याने मंदिराच्या मूर्तीची देखभाल करण्याचा अधिकार स्वतःकडे द्यावा, अशी मागणी केली होती. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने ती याचिका फेटाळल्यानंतर, विषय सुप्रीम कोर्टात गेला.

सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले की, राष्ट्रीय किंवा ऐतिहासिक महत्त्वाच्या सर्व स्मारकांचे संरक्षण हे फक्त भारतीय पुरातत्व विभागाचे कार्यक्षेत्र आहे. कोणत्याही खाजगी व्यक्तीला, श्रद्धा कितीही प्रगाढ असली तरी, त्यावर मालकी किंवा नियंत्रणाचा अधिकार नाही. न्यायालयाने सांगितले की श्रद्धा ही वैयक्तिक गोष्ट आहे, कायद्याचा भाग नाही.

याच वाक्याचा विपर्यास करून काही गटांनी तो 'देवांचा अपमान' म्हणून सादर केला आणि त्यातूनच कालची ही अभूतपूर्व घटना घडली. ही घटना एकटी नाही.

अलीकडच्या काही वर्षांत न्यायव्यवस्थेवर दबाव टाकण्याच्या घटना वाढल्या आहेत. अयोध्या प्रकरणात न्यायाधीशांना उघड धमक्या मिळाल्या होत्या.

सेतुसमुद्रम प्रकल्पाच्या सुनावणीवेळी (2007) काही संघटनांनी सुप्रीम कोर्टावर 'धर्मद्रोही' असल्याचे ठपके ठेवले. त्रिपल तलाक प्रकरणात न्यायालयाने संविधानिक अधिकारांचे संरक्षण केले असताना त्यावर 'धर्मात हस्तक्षेप' असा आरोप झाला. ही सर्व उदाहरणे दाखवतात की जेव्हा न्यायालयीन निर्णय काही धार्मिक अथवा राजकीय अपेक्षांशी जुळत नाहीत, तेव्हा तर्कशुद्ध चर्चेऐवजी अपमान, धमक्या आणि हिंसेचा मार्ग स्वीकारला जातो.

कालचा प्रसंग ही त्याचीच शोकांतिका आहे. भारत श्रद्धेचा देश आहे. येथे उपासना आणि देवभक्तीला मान आहे. पण श्रद्धा न्यायनिवाड्याचा पाया असू शकत नाही.

संविधानानुसार, प्रत्येक नागरिकाला धर्मस्वातंत्र्य आहे, परंतु सार्वजनिक आणि ऐतिहासिक स्थळांवरील हक्क कायद्याने ठरतात, भक्तिभावाने नव्हे. सुप्रीम कोर्टाने 'देवाचा अपमान' केला नाही.

तर कायद्याचे आणि संविधानाचे रक्षण केले.

न्यायालय हे देवाचे प्रवक्ते नाही, तर न्यायाचे रक्षक आहेत.

जर भारताचा मुख्य न्यायाधीश स्वतःच्या कोर्टात अपमानित होऊ शकतो, तर लहान जिल्ह्यांतील न्यायाधीश किती असुरक्षित असतील, याची कल्पना करा!

न्यायालयीन स्वातंत्र्याला जर भयाची छाया पडली, तर निष्पक्ष न्याय हा शब्दार्थशून्य ठरेल.

न्यायालय हे केवळ संस्था नाही. ते सामान्य नागरिकाला बहुसंख्यवाद, सत्तेचा गैरवापर आणि कट्टरपंथी विचारांपासून वाचवणारे अंतिम बुरूज आहे. अशा घटनांना त्वरित आणि कठोर प्रतिसाद आवश्यक आहे.

न्यायाधीशांना धमकावणे किंवा अपमान करणे हे लोकशाहीविरोधी कृत्य आहे. दोषींवर जलद आणि उदाहरणार्थ शिक्षा झाली पाहिजे, जेणेकरून न्यायसंस्थेवर पुन्हा अशा प्रकारे कोणी हात उचलण्याचे धाडस करणार नाही. न्यायसंस्था म्हणजे लोकशाहीचे रक्षणही केवळ न्यायाधीशांची लढाई नाही तर ही प्रत्येक नागरिकाची लढाई आहे. न्यायालयाची स्वतंत्रता अबाधित ठेवणे ही आपली राष्ट्रीय जबाबदारी आहे.

जेव्हा न्यायालयावर हल्ला होतो, तेव्हा प्रत्यक्षात भारताच्या प्रजासत्ताकावरच आघात होतो. 'न्यायालयाचे रक्षण म्हणजे लोकशाहीचे रक्षण' आणि लोकशाही जपणे ही प्रत्येक जागरूक नागरिकाची सर्वोच्च जबाबदारी आहे.

– **ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबळे, मुख्य संपादक**

# ...अमित शाहांच्या दौऱ्याआधीच शेतकऱ्यांना पॅकेज जाहीर करायला हवे होते : काँग्रेस

**अकोला :** राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात असताना त्याला भरीव मदत देण्यास भाजपा युती सरकार उदासीन आहे. महाराष्ट्राने प्रस्ताव पाठवला की मदत देऊ हे वेळकाढूपणा व असंवेदनशिलपणाचे लक्षण आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येण्याआधीच केंद्र सरकारने शेतकऱ्यांना मदतीचे पॅकेज जाहीर करायला हवे होते. शेतकऱ्यांचे सर्वकाही उद्ध्वस्त झाले असताना प्रस्तावाची वाट कसली पाहता, असा सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित केला आहे. अकोला येथे पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, महाष्ट्रातील सर्व निर्णय अमित शाह हेच घेत असतात, ते सुपर मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत जाहीर करायला हवी होती पण तसे झाले नाही तसेच अहिल्यानगरच्या कार्यक्रमातच मदतीचे पॅकेज जाहीर करायला पाहिजे होते. मुख्यमंत्री दिल्लीला गेले पण त्यांनी शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रस्ताव पाठवला नाही तर सुरजागडच्या खाणीतून जास्त मलई कशी मिळवता येईल हा प्रस्ताव घेऊन ते दिल्लीला गेले आणि शेतकऱ्यांसाठी मदत न घेताच हात हलवत परत आले.



राज व उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या प्रश्नावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, भाजपाच्या हुकूमशाही विरोधात मविआ व इंडिया आघीडीची स्थापना झालेली आहे, नरेंद्र मोदी व भाजपला सत्तेपासून दूर ठेवणे हा त्यामागचा हेतू होता तसेच संविधानाला अभिप्रेत भारत घडवणे हा संकल्प त्यामागे होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आघाडीचा निर्णय स्थानिक पातळीवर घेण्याचे अधिकार दिलेले आहेत असेही सपकाळ यांनी स्पष्ट केले.

# मध्यप्रदेशात कफ सिरपमुळे आतापर्यंत 16 मुलांचा मृत्यू

## औषध कंपनी कुठे आहे याची चौकशी करण्यासाठी एक विशेष तपास पथक तामिळनाडूला पाठवले जाईल

**भोपाल :** 'कोल्ड्रिफ' या कफ सिरपमुळे झालेल्या 16 मुलांच्या मृत्यूची चौकशी आता मध्य प्रदेश विशेष तपास पथक (एसआयटी) करणार आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पोलिसांनी 12 सदस्यीय विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. या प्रकरणासंदर्भात डॉ. प्रवीण सोनी यांना अटक करण्यात आली आहे आणि त्यांना निलंबित करण्यात आले आहे. प्रवीणने बहुतेक मुलांना कफ सिरप लिहून दिल्याचा आरोप आहे. कफ सिरप बनवणाऱ्या कंपनीविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, उपविभागीय दंडाधिकारी (एसडीओ) जितेंद्र सिंह जाट यांच्या नेतृत्वाखालील एसआयटी औषध कंपनीच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी तामिळनाडूला जाईल. छिंदवाडा जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की,




नागपूरमध्ये सध्या आठ मुलांवर उपचार सुरू आहेत, त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे. बैतुल जिल्ह्यातही दोन मुलांचा मृत्यू झाला आहे, ज्यांना थंडीपासून बचाव करणाऱ्या सिरपच्या परिणामामुळे मृत्यू झाल्याचा संशय आहे. शनिवारी रात्री कप सिरपचा चाचणी अहवाल समोर आला. चाचणीत या सिरपमध्ये धोकादायक विषारी रसायन असल्याचे आढळून आले. तामिळनाडू ड्रग्ज कंट्रोल डिपार्टमेंटच्या प्रयोगशाळेने केलेल्या चाचणीत कोल्ड्रिफ सिरपमध्ये 46.2टक्के डायथिलीन ग्लायकोल (डीईजी) आढळून आले.

# सोनम वांगचुक यांच्या अटकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**नवी दिल्ली :** आज (6 ऑक्टोबर) सर्वोच्च न्यायालयात पर्यावरण कार्यकर्त्या सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अंगमो यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. या याचिकेत राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत वांगचुक यांच्या अटकेला आव्हान देण्यात आले आहे आणि त्यांची तात्काळ सुटका करण्याची मागणी करण्यात आली आहे. न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकार आणि केंद्रशासित प्रदेश लडाखकडून या याचिकेवर उत्तरे मागितली. तथापि, न्यायालयाने या प्रकरणात त्वरित निकाल देण्यास नकार दिला. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि एनव्ही अंजनिया यांचे खंडपीठ आता 14 ऑक्टोबर रोजी या प्रकरणाची पुढील सुनावणी करणार आहे. गीतांजलीच्या वतीने वकील कपिल सिब्बल न्यायालयात हजर झाले. त्यांनी न्यायाधीशांना सांगितले की सोनमच्या ताब्यात ठेवण्याच्या कारणांबद्दल कुटुंबाला माहिती देण्यात आली नव्हती. दरम्यान, केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की ताब्यात घेतलेल्या व्यक्तीला (सोनम वांगचुक) त्याच्या ताब्यात ठेवण्याच्या कारणांबद्दल माहिती देण्यात आली आहे आणि त्याच्या पत्नीला त्याची प्रत देण्याचा विचार केला जाईल.



# मालाच्या यशाने जिल्हाधिकारीही भारावले

**नागपूर :** नाव- माला शंकरबाबा पापळकर. ती जन्मतः दृष्टिहीन अन् अनाथ. जळगावात कचराकुंडीतून उचलून आणलेले ते रोपटे पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांनी अमरावती जिल्ह्यातील वझ्झर येथील अनाथाश्रमात रूजविले, संगोपन केले. ब्रेल लिपी व आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने ती राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाली. सोमवारी नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल सहाय्यक पदावर रूजू झालेल्या मालाचे असे देवदुर्लभ स्वागत झाले की, तिच्यासारख्या हजारो, लाखो अनाथ. निराधार तरूण-तरूणींच्या मनांमध्ये प्रेरणेचे दीप उजळून निघावेत. एरव्ही रूक्ष सरकारी कोंदटपणा अनुभवणाऱ्या जिल्हा कचेरीत सोमवारची सकाळ आगळीवेगळी होती. स्वतः शंकरबाबा आणि वझ्झर आश्रमातील त्यांची मुले-मुली आनंदी चेहऱ्याने मालाच्या कर्तबगारीचे साक्षीदार बनण्यासाठी उपस्थित होते. या सर्वांच्या स्वागताला जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे व इतर सज्ज होते. खुद्द महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सायंकाळी तिची भेट घेऊन मालाच्या नव्या प्रवासाला शुभेच्छा दिल्या.







# बिहारमध्ये निवडणुकीचा बिगुल!

**पटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीचा बिगूल अखेर वाजला. केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आज निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. बिहारमध्ये दोन टप्प्यात विधानसभा निवडणूक होणार असून, 14 नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. बिहार विधानसभेच्या 243 जागांसाठी दोन टप्प्यात मतदान पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यासाठी 10 ऑक्टोबरला अधिसूचना काढली जाणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यासाठी 13 ऑक्टोबरला अधिसूचना जारी होणार आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमाप्रमाणे पहिल्या टप्प्यासाठी 6 नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यासाठी 11 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर 14 नोव्हेंबर रोजी निकाल घोषित केला जाणार आहे. बिहार विधानसभेसाठी पहिल्या टप्प्यात 121 जागांसाठी मतदान होणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यात 122 जागांसाठी मतदान आहे. तुम्ही नकाशा बघितला तर तुमच्या लक्षात जो भाग पिवळा दाखवला आहे, तेथील मतदारसंघात पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे. तर गुलाबी रंगात दिसणाऱ्या मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे.

## राज्यातील 247 नगरपालिका, 147 नगरपंचायतींसाठी आरक्षण जाहीर

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही दिवसात जाहीर होणार आहेत. निवडणूक आयोगाने जोरदार तयारी सुरू केली आहे. राज्यातील 247 नगरपालिका आणि 147 नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षण सोडत जाहीर झाले आहे. राज्यातील 67 नगर परिषदांच्या अध्यक्षपद ओबीसींसाठी जाहीर झाले आहे 67 नगरपरिषदपैकी 34 ओबीसी महिलासाठी आरक्षित करण्यात आले. एकूण 74 जागा राखीव आहेत, यामधील सर्वसाधारण महिलांसाठी 38 जागा अनुसूचित जातीसाठी तर 7 जागा अनुसूचित जमातीसाठी तसेच 20 जागा मागास प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तिरोडा, वाशिम, धामणगाव, भोकरदन, भद्रावती, परांडा, भगूर, मालवण, नंदुरबार, खापा, वरोरा, हिंगोली, मोर्शी, शहादा, उमरेड,नवापूर, त्र्यंबक, कोपरगाव, हिवरखेड, बाळापूर, शिरूर,कुळगाव, बदलापूर ), मंगळूरपीर, कन्हान पिंपरी,पाथर्डी, देगलूर,नेर नबाबपूर, धाराशिव,इगतपुरी,रामटेक, माजलगाव, नाशिराबाग, पालघर, मूल, वरणगाव, बल्हारपूर, मलकापूर (बुलढाणा), इस्लामपूर, जुन्नर, कुरडुवाडी, मोहपा, तुमसर, औस, महाड, मुरुड जंजिरा, अकोट, चोपडा, सटणा,काटोल, गोंदिया सांगोला, दौंड, राहता, श्रीवर्धन, रोहा, ब्रम्हपुरी, देसाईगंज, येवला, कुलगाव, कर्जत, दौंडाईचा वरवडे, कंधार, शिरपूर वरवडे या नगरपरिषदांसाठी ओबीसीसाठी आरक्षित.

### बिहार विधानसभा निवडणूक – महत्त्वाच्या तारखा

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची **अखेरची तारीख** – पहिल्या टप्प्यासाठी 17 ऑक्टोबर, दुसऱ्या टप्प्यासाठी 20 ऑक्टोबर.

**अर्ज पडताळणीची तारीख** – पहिल्या टप्प्यासाठी 18 ऑक्टोबर, दुसऱ्या टप्प्यासाठी 21 ऑक्टोबर.

**उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख** – पहिल्या टप्प्यासाठी 20 ऑक्टोबर, दुसऱ्या टप्प्यासाठी 23 ऑक्टोबर.

**मतदानाची तारीख** – पहिला टप्पा 6 नोव्हेंबर, दुसरा टप्पा 11 नोव्हेंबर.

**मतमोजणी** – 14 नोव्हेंबर.

## भाजपाने तारखा दिल्या, ज्ञानेश कुमारांनी वाचून दाखवल्या...

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. बिहार विधानसभा निवडणुका दोन टप्प्यात होणार आहे. 6 नोव्हेंबर 2025 आणि 11 नोव्हेंबर 2025 रोजी मतदान होईल. बिहार विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर होताच आरोप-प्रत्यारोप सुरू झाले असून, विरोधकांनी भाजपा आणि केंद्रीय निवडणूक आयोगावर टीका केली आहे. इतका निर्लज्ज निवडणूक आयोग कधीच पाहिला नाही. ज्या आयोगाकडून निष्पक्ष राहण्याची अपेक्षा होती, त्या निवडणूक आयोगाने तो आमचा भ्रम होता, हे दाखवून दिले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी भाजपा मुख्यालयातून पाठवलेला निवडणूक वेळापत्रक फक्त वाचून दाखवले. बिहारमधील प्रत्येक लहान मुलाला माहिती होते की, अपूर्ण मेट्रोच्या उद्घाटनानंतर निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या जातील. आयोगाने त्याची विश्वासार्हता कलंकित केली, अशी टीका पूर्णिया येथील खासदार पप्पू यादव यांनी केली.




स्मृतिशेष अभियान शशिकांत हुमणे

प्रिय अभियान,
तू आमच्यात नाहीस, पण तुझी आठवण प्रत्येक क्षणी आहे. तुझ्या वाढदिवशी तुझं हसू, तुझं ज्ञान आणि तुझं योगदान आठवत आहेत. तुझा अभिमान नेहमी राहील...
आज तुझा वाढदिवस आहे,
तू नसला तरी तुझ्या आठवणी, तुझं संशोधन आणि तुझं कार्य आजही नालंदा अभियान लॅबच्या विद्यार्थ्यांच्या तसेच नालंदा अभियान ॲकाडमिच्या विद्यार्थ्यांच्या मनात जिवंत आहे. तुझ्या कार्याला आणि स्वप्नांना सलाम !



वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !



जन्म : 07-10-1976

शशिकांत, कांता हुमणे व वाघमारे, खांडेकर आणि कोसे परिवार तसेच नातलग व नालंदा अभियान ट्रस्ट, वर्धा.

बहुजन सौरभ परिवार

बहुजन सौरभ संपादकीय

# लदाखकडे लक्ष द्या शांततेचा आवाज दडपू नका

लडाखमधील अलीकडील घटनांनी पुन्हा एकदा हा प्रदेश किती नाजूक स्थितीत आहे हे अधोरेखित केले आहे. ‘सर्वाधिक रक्तरंजित दिवस’ म्हणून ओळखल्या गेलेल्या घटनेत चार निषस्त्र आंदोलकांचा बळी गेला. सरकारचे स्पष्टीकरण वेगळे आणि आंदोलकांचे दावे वेगळे – पण सत्य एवढेच की परिस्थिती अधिक गंभीर होत चालली आहे.

भाजप नेते व माजी खासदार जम्यांग त्सेरिंग नामग्याल यांनी राज्यपालांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे की ‘लडाख आज एका नाजूक टप्प्यावर उभा आहे.’ अनुच्छेद 370 रद्द झाल्यानंतर लडाखला स्वतंत्र केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाला, पण त्यानंतर लोकांच्या अपेक्षा आणि वास्तव यात मोठा दरी निर्माण झाला आहे.

आंदोलकांचा आवाज आणि सरकारची प्रतिक्रिया : इंजिनिअर व संशोधक सोनम वांगचुक यांनी केलेल्या उपवासाने लडाखवासीयांच्या भावना जागृत केल्या. जनतेने त्यांना प्रचंड पाठिंबा दिला. पण सरकारने त्यांच्या भाषणांना ‘उत्तेजक’ ठरवून त्यांच्यावर देशद्रोहाचे आरोप ठेवले, ही अतिशय खेदजनक बाब आहे.

चार निषस्त्र आंदोलकांचा मृत्यू कसा झाला, याचे समाधानकारक उत्तर अजूनही दिले गेलेले नाही. कठोर पोलिसी कारवाई आणि असहमत आवाज दडपण्याचा प्रयत्न हा समस्या सोडवण्याचा मार्ग ठरू शकत नाही. उलट त्यामुळे असंतोष आणखी वाढण्याची शक्यता आहे. लडाखची सामाजिक आणि धार्मिक वास्तवता: सध्या लडाखमध्ये जवळपास 90टक्के लोकसंख्या बौद्ध आणि आदिवासी समाजाची आहे. या समाजाची परंपरा ही शांतीप्रिय असून त्यांचे जीवन बुद्धत्वाच्या मूल्यांवर आधारलेले आहे. त्यांचे नेते उच्चशिक्षित आणि प्रगत विचारांचे असूनही, त्यांच्यावर देशद्रोहाचे आरोप लावणे ही एक निंदनीय व अन्याय्य बाब आहे.भारत सरकारने हे लक्षात घेतले पाहिजे की लडाख हा भाग थेट पाकिस्तान आणि चीनच्या सीमेला लागून आहे. हे दोन्ही देश भारताचे शत्रू असून ते कधीही लडाखमधील परिस्थिती अस्थिर करण्यासाठी शस्त्रास्त्रांचा पुरवठा करू शकतात. त्यामुळे या प्रदेशातील जनतेचा विश्वास संपादन करणे आणि शांतता टिकवणे हे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे आहे. राजकीय मागण्या आणि वास्तवातील अडचणीः लडाखवासीयांच्या दोन प्रमुख मागण्या आहेत. सहाव्या अनुसूचीतील समावेश आणि राज्याचा दर्जा. परंतु 3 लाख लोकसंख्येच्या लडाखसाठी या मागण्या पूर्ण करणे कठीण आहे. जम्मू-कश्मीरलाही अद्याप सहावी अनुसूची नाकारली गेली असताना लडाखला ती मिळणे अवघड आहे. यावर्षी संसदीय समितीसमोर सरकारने मान्य केले की 2019 पासून लडाखमधील 1,275 गट-अधिकारी पदे रिक्त आहेत. अशा परिस्थितीत जनतेच्या अपेक्षा स्वाभाविक आहेत. रोजगार, शिक्षण, पर्यावरणीय संरक्षण आणि सांस्कृतिक ओळख याबाबत त्यांना ठोस हमी मिळाली पाहिजे. पर्यावरण आणि हवामानाचा प्रश्न लडाखवासीयांना हवामान निर्वासित होण्याची भीती आहे. हिमालयीन परिसंस्था अतिशय नाजूक आहे आणि हवामानबदलाचा त्यावर थेट परिणाम होत आहे. हिमनद्या वितळत आहेत, पाण्याची टंचाई वाढत आहे, शेती आणि चराईवर संकट आले आहे. त्यामुळे पर्यावरणीय सुरक्षेला प्राधान्य न दिल्यास परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते. बौद्ध परंपरेतून मार्ग : संपूर्ण जगात बौद्ध राष्ट्रे शांतताप्रिय म्हणून ओळखली जातात. लडाखच्या लोकांमध्येही हीच परंपरा खोलवर रुजलेली आहे. आजच्या राजकारण्यांनी या वास्तवाची जाणीव ठेवली पाहिजे. यातूनच मार्ग निघतो - तथागत भगवान बुद्ध आणि परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिकवणुकीतून. समानता, अहिंसा, बंधुता आणि लोकशाही या मूल्यांवर आधारित तोच मार्ग लडाखवासीयांसाठी खरा तारणहार ठरू शकतो. लडाखच्या लोकांनी केलेल्या मागण्या कदाचित मोठ्या असतील, पण त्यांचा स्वभाव शांतताप्रिय आहे. त्यांचा आवाज दाबण्याऐवजी संवादातून त्यांना न्याय मिळवून देणे हेच योग्य ठरेल. अन्यथा असंतोषाचा फायदा घेण्यासाठी सीमापार शक्ती सदैव तयारच आहेत. केंद्र सरकारकडे संकटातून परिस्थिती परत आणण्याचा एक परीक्षित मार्ग आहे - तो म्हणजे विश्वास, संवाद आणि सहभाग. आज लडाखला त्याचीच सर्वाधिक गरज आहे. ■ ■

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी व्यक्त केलेले इंग्रजीचे महत्व आजही आहे.

**जगातील सर्वच भाषा महत्वाच्या ठरतात. कारण त्या मानवी संवाद साधतात. मातृभाषा मराठी भाषेला महत्व देत असताना इंग्रजी भाषेला कमी लेखणारे काही लोक आहेत. ते स्वतःची मुले इंग्रजी माध्यमातून शिकवतात. इतरांना मराठी माध्यमातून शिक्षणाचे महत्व सांगतात. मातृभाषेत कोणताही विषय लवकर अवगत होतो हे वास्तव आहे. परंतु जागतिक व्यवहार भाषा म्हणून इंग्रजीचे महत्व आहे. सामान्य समाज कुणाच्या भूलथापेला बळी जाऊ नये म्हणून हा लेख लिहत आहे.**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी एक सुंदर कविता लिहिली आहे, ‘इंग्रजी माऊली’. त्या म्हणतात, इंग्रजी माऊली! इंग्रजी वैखरी, शूद्रांना उद्धारी, मनोभावे !!
पूर्ण कविता अशी
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी लिहिलेल्या अनेक कवितेतील एक कविता.

**‘इंग्रजी माऊली’**
**इंग्रजी माऊली ! इंग्रजी वैखरी**
**शूद्रांना उध्दारी ! मनोभावे !!**
**इंग्रजी माऊली ! नाही मोगलाई**
**नाही पेशवाई ! मूर्खशाही !!**
**इंग्रजी माऊली ! देई सत्य ज्ञान**
**शूद्राला जीवन ! देई प्रेम !!**
**इंग्रजी माऊली ! शूद्रांना पान्हा पाजी**
**संगोपन आजी ! करतसे !!**
**इंग्रजी माऊली ! तोडसे पशुत्व**
**देई मनुष्यत्व ! शूद्रलोका !!**

त्या काळात सावित्रीबाईनी इंग्रजीला ‘माऊली’ म्हटले, कारण ही भाषा शोषित-पिडीत समाजाला अंधःकारातून बाहेर काढणारी, ज्ञान देणारी ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही लहानपणी इंग्रजी व्याकरणाचे धडे त्यांच्या वडिलांकडून मिळाले होते. त्या इंग्रजी भाषा ज्ञानाच्या आधारावर त्यांनी पुढे जगभरात आपले विचार मांडले, आधी उच्च शिक्षण घेतले.

मित्रहो, इंग्रजी आज का महत्त्वाची आहे?
कारण ती जागतिक भाषा आहे. जगात कुठेही जा, इंग्रजी बोलली आणि समजली जाते. इंटरनेट असो, विज्ञान असो, तंत्रज्ञान असो, व्यावसायिक जग असो इंग्रजीशिवाय संवादच होऊ शकत नाही. इतिहासात पाहिले तर ब्रिटिश साम्राज्याने वसाहती स्थापल्या, त्या बरोबर इंग्रजी पसरली. दुसरे म्हणजे विज्ञान आणि तंत्रज्ञानातील सर्व महत्त्वाचे शोध इंग्रजीत नोंदले गेले. त्यामुळे इंग्रजी ही विज्ञानाची भाषा झाली. आज इंग्रजी का शिकावी? कारण शैक्षणिक संधींचे दरवाजे इंग्रजीमुळे उघडतात. कारण जागतिक नोकरीच्या बाजारपेठेत इंग्रजीशिवाय पर्याय नाही. कारण उच्च शिक्षणाचे बहुतेक साधनसामग्री इंग्रजीतच आहे. इंग्रजीची काही वैशिष्ट्येही विशेष आहेत. हृश्वह्ल्ह्य हा शब्द आपण दररोज ऐकतो. पण त्याचा अर्थ हृश्वह्ल्ह्द्र, श्वङ्गह्यह्ल, ह्लद्रह्यह्ल, स्थह्लह्द ङ्क म्हणजे चौही दिशांकडून आलेली माहिती. एवढा सुंदर संकल्पनात्मक विचार इंग्रजीत आहे. मी मायमराठीचा सुद्धा पुरस्कर्ता आहे. आपली मातृभाषा आहे. पण जगाशी संवाद साधण्यासाठी इंग्रजी आवश्यक आहे. त्यामुळे मातृभाषा आणि इंग्रजी या दोन्हींचा संगम साधला पाहिजे. आज इंग्रजी ही फक्त भाषा नाही, तर ज्ञानाचा खजिना आहे. सावित्रीबाई फुले, डॉ. आंबेडकर यांच्याप्रमाणेच आपणही इंग्रजीचे महत्त्व ओळखले पाहिजे. म्हणूनच मी एवढेच सांगेन, इंग्रजी ही आपल्या मातृभाषेची स्पर्धक नाही, तर ज्ञानाचा दुवा आहे. जागतिक यश आणि स्थानिक आत्मभान या दोन्हींसाठी इंग्रजी अपरिहार्य आहे. मी वकीली करताना व न्यायाधीश म्हणून काम करताना न्यायालयात बघितले की, इंग्रजित युक्तिवाद करणाऱ्या वकिलांचा प्रभाव असतो. उच्च व सर्वोच्च न्यायालयात तर इंग्रजीत युक्तिवाद आणि इतर व्यवहार चालतात. तेथे सुद्धा अस्खलित इंग्रजी बोलणाऱ्याची चलती असते. अमेरिका, इंग्लंड सारख्या देशांमध्ये शिक्षण किंवा नोकरी करायची असेल तर तेथील इंग्रजी भाषेत बोलता आले पाहिजे ही पात्रता असते. व्हिसा कार्यालयात ते इंग्रजीत मुलाखत घेतात. मोठमोठ्या कंपन्या जेथे नोकरीची संधी असते तेथे छान इंग्रजी भाषेत संवाद साधतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहलेले ग्रंथ किंवा इतरही विचारवंतांचे प्रसिद्ध ग्रंथ नेमकेपणाने समजून घेण्यासाठी इंग्रजी भाषा अवगत असावी लागते.

भारतात ब्रिटिश आले त्यानंतर 1835 चा इंग्रजी शिक्षण कायदा लागू केला. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे तत्कालीन गव्हर्नर-जनरल लॉर्ड विल्यम बेंटिक यांनी भारतातील शिक्षण आणि साहित्यावर खर्च करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीचे पुनर्वाटप करण्याच्या निर्णयाला अंमलात आणले. त्यांचा हेतू पाश्चात्य अभ्यासक्रम शिकवणाऱ्या संस्थांना पाठिंबा देण्याचा होता. ज्यामध्ये इंग्रजी ही शिक्षणाची भाषा असेल. प्रशासनाची आणि उच्च कायदा न्यायालयांची भाषा म्हणून इंग्रजीला प्रोत्साहन दिले. मुघल साम्राज्यात असलेल्या फारसीऐवजी अखेर इंग्रजी ही परदेशी शासकांची मातृभाषा न राहता भारताच्या भाषांपैकी एक बनली. ती एक समृद्ध भाषा आहे. त्यामुळे इंग्रजी साहित्य भारतीयांना वाचता आले. कादंबरी हा प्रकार इंग्रजी भाषेतूनच नॉव्हेल मधून आपण घेतला आहे. पूर्ण विराम चिन्ह मराठी मोडीत नव्हते, ते आपण इंग्रजीतून फुल स्टॉप आहे ते घेतले आहे. इंग्रजी ड्रामावरून मराठी नाटके तयार केली गेली. वि. वा. शिरवाडकर लिखित मराठी नाटक ‘नटसम्राट’ हे शेक्सपियरच्या ‘किंग लिअर’ या नाटकावर आधारित आहे. शिरवाडकर यांनी किंग लिअरला एका महान मराठी अभिनेत्यामध्ये रूपांतरित केले, जो एक निवृत्त आणि वृद्ध रंगभूमीचा कलाकार आहे ज्याला त्याच्या मुलांकडून अपमान आणि उपेक्षा सहन करावी लागते. महात्मा जोतिबा फुले यांना थॉमस पेन यांच्या साहित्याने प्रभावित केले. परिणामी त्यांनी मानवी हक्काची चळवळ केली. महात्मा जोतिबा फुले थॉमस पेन यांच्या ‘द राइट्स ऑफ मॅन’ या ग्रंथाने आणि त्यांच्या विचारांनी प्रभावित झाले होते, ज्यामुळे त्यांना सामाजिक न्यायाच्या महत्त्वाविषयी विचार करण्यास प्रेरणा मिळाली. या ग्रंथाचा त्यांच्या मनावर खूप मोठा प्रभाव पडला होता आणि त्यामुळे त्यांच्या सामाजिक विचारांना बळ मिळाले. हे सर्व इंग्रजी भाषा अवगत झाल्यामुळे झाले.




अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
9657758555

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू हे सर्व राष्ट्रीय नेते इंग्रजी भाषा अवगत झाल्यामुळे इंग्लंडमध्ये जाऊन बॅरिस्टर होऊ शकले. महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, छत्रपती सयाजीराव गायकवाड यांना अस्खलित इंग्रजी अवगत होते. देशविदेशात तर सोडा भारताच्या दक्षिणेकडील राज्यात किंवा पूर्वेकडील राज्यात हिंदी किंवा मराठी ऐवजी इंग्रजी भाषा समजणारे अधिक लोक आहेत. वैद्यकीय, तांत्रिक, भौगोलिक इत्यादी जवळजवळ सर्व विषयाचे ग्रंथ इंग्रजी भाषेत उपलब्ध आहेत. म्हणूनच क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांनी लिहलेली इंग्रजी भाषेबाबतची कविता आजही प्रासंगिक आहे. इंग्रजी ही 53 देशांमध्ये अधिकृत भाषा आहे आणि जगभरातील सुमारे 40 कोटी लोक ती पहिली भाषा म्हणून बोलतात. पण एवढेच नाही तर ती जगातील सर्वात सामान्य दुसरी भाषा आहे. कोणी कितीही इंग्रजीला डावलण्याचा प्रयत्न केला तरी तिचे जागतिक स्तरावर महत्व कमी होणार नाही. मम्मी किंवा मॉम शब्दाने जागतिक स्तरावर जन्मदातीला ओळखल्या जाते तर आई महाराष्ट्रात आहे. देश विदेशात मम्मी मॉम प्रचलित आहे ही वस्तुस्थिती स्वीकारली पाहिजे. मराठी भाषेची समृद्धी टिकविण्यासाठी सुद्धा प्रयत्न करायला हवेत. मुघल आणि इस्लामी राजवटीत मराठी भाषेला फारशी भाषेचे स्वरूप आले होते. तर यादवकालीन मराठीने मुघल राजवटीची कवच कुंडले सोडली. फारशी भाषेचे अतिक्रमण मोडून काढण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराज यांनी केले. मराठी भाषेत अनेक समृद्ध साहित्याची निर्मिती झाली आहे. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेले पसायदान मराठी भाषेत विश्वाची कल्पना देते. संत एकनाथ महाराजांनी भारूड लिहिले. संत तुकारामांनी अभंग लिहिले. ही मराठी भाषेची अभिजात समृद्धी आहे. मराठी भाषेवर परकीय भाषेचे अतिक्रमण झाल्याने अनेक इतर भाषिक शब्दांचा मराठीत सहजरितीने वापर होताना दिसतो. असे असले तरी मराठी मायबोलीत प्रगल्भता आहे, मराठी भाषेला घरात मातृत्वाचा दर्जा मिळायलाच हवा तरच मराठी भाषा टिकण्यास मदत होईल, हे खरे आहे. पण काही इंग्रजी शब्द व वाक्प्रचार मराठीत इतका रुजला आहे की तो न वापरणे कृत्रिमता होईल. टेलिव्हिजनसाठी टी वी शब्द न वापरता दूरचित्रवाणी म्हणणे, बॅट बॉल ला फळी चेंडू म्हणणे कसे कृत्रिम वाटू लागते. नैसर्गिक वाटत नाही. सावित्रीबाई फुलेंच्या कवितेची समीक्षा करण्यासाठी परत आठवण करू. त्या लिहतात -

‘इंग्रजी माऊली’
**इंग्रजी माऊली ! इंग्रजी वैखरी**
**शूद्रांना उद्धारी ! मनोभावे !!**
**इंग्रजी माऊली ! नाही मोगलाई**
**नाही पेशवाई ! मूर्खशाही !!**
**इंग्रजी माऊली ! देई सत्य ज्ञान**
**शूद्राला जीवन ! देई प्रेम !!**
**इंग्रजी माऊली ! शूद्रांना पान्हा पाजी**
**संगोपन आजी ! करतसे !!**
**इंग्रजी माऊली ! तोडसे पशुत्व**
**देई मनुष्यत्व ! शूद्रलोका !**

सावित्रीबाईंनी ही कविता लिहिण्याचा काळ व पार्श्वभूमी लक्षात घेणे गरजेचे आहे. त्या काळात लिहिली गेली, जेव्हा भारतात इंग्रज, मोगलाई, पेशवाई आणि जातिवादी सामाजिक व्यवस्थामुळे शूद्र, अति-शूद्र आणि स्त्रिया यांना अज्ञान, अंधश्रद्धा व अन्यायाच्या अंधःकारात ठेवले गेले होते. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. त्यांना वाटले की इंग्रजी शिक्षण हेच त्या काळच्या शूद्रांच्या उद्धाराचे सामर्थ्य आहे. ‘इंग्रजी माऊली’ या प्रतिमेचे महत्व, सावित्रीबाई ‘इंग्रजी’ला ‘माऊली’ म्हणजे आई म्हणतात. कारण आईप्रमाणे ती शूद्रांना संगोपन देते, पाजते, प्रेम देते, अंधारातून बाहेर काढते. मोगलाई, पेशवाई, मूर्खशाही यांचा त्यांनी निषेध केला. इंग्रजी शिक्षण शूद्रांना सत्यज्ञान, प्रेम, मनुष्यत्व देते असे त्यांनी गौरविले. कवितेतील प्रमुख संदेश शिक्षणच उद्धाराचे साधन आहे ते शूद्रांना समता, आत्मसन्मान आणि मनुष्यत्व देणारे शिक्षण. अन्यायी सत्ता व्यवस्थेचा विरोध करण्यासाठी पेशवाई-मोगलाईच्या काळात शूद्रांचा अपमान व शोषण याविरुद्ध त्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी. मानवी मूल्ये व समता शिक्षणाद्वारे पशुत्व तोडून मानवतेचा प्रकाश पसरविण्यासाठी त्यांनी कवितेतून संदेश दिला. काव्यभाषा व शैली अशी आहे की, कविता अत्यंत सरळ, भावपूर्ण आणि लयबद्ध आहे. ‘माऊली’ हा शब्द वापरून इंग्रजी शिक्षणाला मातृसमान महत्त्व दिले आहे. प्रत्येक कडव्यात ठाम संदेश, पुनरुक्ती आणि लय वापरून प्रभाव वाढविला आहे. सावित्रीबाईंची ही कविता ही केवळ इंग्रजी शिक्षणाचे स्तोत्र नाही, तर सामाजिक क्रांतीचे घोषणापत्र आहे. यात त्यांनी दाखवले आहे की शिक्षणाशिवाय शूद्रांना माणूसपण मिळणार नाही. त्यांनी इंग्रजीला ‘माऊली’ म्हटले कारण तिने गुलामीत असलेल्या लोकांना स्वातंत्र्याची, समानतेची आणि आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. ‘इंग्रजी माऊली’ ही कविता म्हणजे शिक्षण, समता आणि मानवतेचा जयघोष आहे. सावित्रीबाईंच्या विचारांमध्ये प्रचंड क्रांतीशीलता आहे आणि आजही ही कविता आपल्याला शिक्षणाच्या महत्त्वाची जाणीव करून देते. या कवितेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी इंग्रजीचे महत्व विषद केले ते आजही कायम आहे. ■ ■

# धर्म माणसासाठी...

धर्म माणसासाठी आहे, माणूस धर्मासाठी नाही, अन् धर्म जगण्यातून आला पाहिजेत. ज्या धर्मामध्ये आम्ही जन्म घेतला तो धर्म नसून एक विषमतेवर आधारित माडी होती. खालचा वर जाऊ शकत नव्हता आणि वरचा खाली येऊ शकत नव्हता अशी वर्ण व्यवस्था त्या धर्मामध्ये होती. मनुस्मृति हे विकृतीच्या गटार आहे तो धर्म नाकारून माणूस असून माणूसपण नाकारणाऱ्या धर्माला सोडून डॉ. बाबासाहेब तुम्ही ज्या वाटेने निघालात ती वाट समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्यायाची वाट आम्हाला तुम्ही दाखवली. ती वाट होती बुद्धांच्या धम्माची 14 ऑक्टोबर 1956 ला बुद्धाच्या धम्मामध्ये आम्हाला विलीन केलेस आणि तेव्हापासूनच मृतःप्राय समाजाला नवचैतन्य मिळाले. म्हणूनच तो समाज आज दीक्षाभूमीवर जाऊन आपली कृतज्ञता व्यक्त करतो. दीक्षाभूमी ही समाज जीवनाचा केंद्रबिंदू ठरला. त्याच दीक्षाभूमीतून दहा वर्षांपूर्वी hrpf नावाची सामाजिक संघटना उदयास आली आणि संघटनेचे अध्यक्ष कायद्याचे अभ्यासक अॅड. माननीय राहुलजी तेलंग सर आणि संघटनेचे सचिव माननीय आशिष भाऊ फुलझेले यांच्या मार्गदर्शनामध्ये गेल्या दहा वर्षांपासून अविरतपणे समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये काम करताना आपल्याला दिसते.



समाजामध्ये अनेक संस्था संघटना आहेत. विविध क्षेत्रांमध्ये काम करतात. अन्न वस्त्र निवारा या कालच्या मूलभूत गरजा होत्या. आजच्या मूलभूत गरजा आहेत अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य hrpf ही सामाजिक संघटना शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रामध्ये अग्रक्रमाने काम करते आहे. संघटनेचा प्रत्येक कार्यकर्ता वैयक्तिक हितापेक्षा सामाजिक हित जगण्याचा आधार असला पाहिजे. या दृष्टीने hrpf चा प्रत्येक कार्यकर्ता काम करताना दिसतो. समाज बांधिलकीने स्वतःचा पैसा वेळ देतो आहे. एखाद्या महापुरुषांच्या विचारांचा प्रभाव आपल्यावर असणे आपण स्वतःला त्या विचारधारेची जोडणे आणि तो विचार आपल्या जगण्यात किती प्रमाणात उतरलेले आहेत हे जास्त महत्त्वाचा आहे. नुसते झेंडे नाचवण्याचे सोहळे करू नये. आपल्याला पूज्यनीय असलेल्या महापुरुषांच्या विचारांचा जागर महत्त्वाचा आहे. विचाराप्रमाणे कृती करूया. उगाच दिखावूपणा नको. म्हणून बॅनरवर स्वतःचा किंवा महापुरुषांच्या फोटोची गर्दी टाळतात. hrpf चा प्रत्येक कार्यकर्ता आपल्या त्यागातून, तपश्चर्येतून, विचारातून, जगण्यातून, संघटनेला समृद्ध करण्याचे काम करत आहेत. मानवतावादी मूल्य जोपासत विद्यार्थ्यांना किंवा रुग्णांना न्याय देण्याचे काम करतो. कार्यकर्त्यांचे कौशल्य आणि प्रामाणिकपणा बघून समाजात चांगले परिणाम येऊ लागले आहेत. युवा पिढी संघटनेशी जुळत आहे. युवक हा स्वतंत्र विचाराचा हवा. कोणाचाही वैचारिक गुलाम असता कामा नये. युवा पिढी जागरूक, दूरदर्शी, कर्तृत्वान आणि आपले समाजाचे नि देशाचे भविष्य उज्वल करणारी पिढी तयार व्हावी. युवकांनी शिक्षण, समाजकारण, राजकारण आणि धर्म या सर्व आघाड्यावर सदैव जागरूक आणि पुढे असायला हवे. त्यासाठी वाचन, चिंतन, मनन याची सवय लागली पाहिजे. युवा पिढी ही डोळस असली पाहिजे. इतिहासापासून बोध घेऊन भविष्याचा वेध घेता आला पाहिजे. यासाठी पूरक आणि प्रेरक वातावरण युवा पिढीला महिन्याच्या चौथ्या रविवारला दीक्षाभूमी येथे म्हणजेच नागपूरच्या मातीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला दीक्षित केले ती भूमी ऊर्जाभूमी म्हणून ओळखले जाते. त्याच दीक्षाभूमी साफसफाई अभियान दरम्यान संघटनेचे अध्यक्ष अॅड. राहुल तेलंग सर आणि सचिव आशिष भाऊ फुलझेले हे मार्गदर्शन करीत असतात. खेड्यापाड्यातून शहरांमध्ये शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन ज्येष्ठ कार्यकर्त्यांकडून मिळत असते. आदिवासी दुर्गम भागामध्ये कपडे वाटपाचे काम देखील संघटना दरवर्षी करत असते. प्रत्येक वर्षी विजयादशमीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांना कुठल्याही प्रकारे त्रास होऊ नये यासाठी hrpf च्या माध्यमातून सेवा दिली जाते. अशा विविध अंगाने काम करत असलेल्या hrpf या सामाजिक संघटनेस पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा. hrpf च्या कार्यकर्त्यांचे धन्यवाद आणि आभार! ■ ■

शब्दांकन
**भिक्खू डॉ. अभयनायक थेरा**

# मोहन भागवतांचा निर्लज्जपणा

**अन्याय कबूल पण आरक्षणावर प्रश्न?**
आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांनी मागासवर्गीयांवर हजारो वर्षे अन्याय झाल्याचे मान्य केले. परंतु आरक्षण सुरू ठेवायचे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार त्यांना कुणी दिला? आरक्षण हे भारतीय राज्यघटनेने दिलेले हक्क आहेत. ‘समान पातळीवर यायचे असेल, तर आधी जातिव्यवस्था नष्ट करा’ हा खरा प्रश्न आहे. जातिव्यवस्था मोडल्याशिवाय समानता नाही. मंदिरातील पुजारी मागासवर्गीय व्हावेत. रोटी-बेटी व्यवहार व्हावेत. भूतकाळात अन्याय करणाऱ्यांनी बहुजन नेत्यांच्या पायाशी माफी मागावी. ‘ही जखम फार जुनी आहे, इतक्या सहज बरी होणार नाही.’



**आदिवासींवरचे षडयंत्र :-** गडचिरोली, लडाख, मणिपूरमधील आदिवासींच्या जमिनी अदानी-अंबानींना देऊन लुटल्या जात आहेत. खनिज संपत्तीच्या हव्यासापोटी आरएसएस-भाजप शासन आदिवासींचे जगणे उध्वस्त करत आहे. 85 कोटी जनतेला मोफत धान्याच्या नावाखाली कायमचे गुलाम बनवण्याचे षडयंत्र सुरू आहे. लोकशाही धोक्यात आंदोलने, मोर्चे, संघटनांवर बंदी, नेत्यांना नजरकैद, माध्यमे व न्यायसंस्था सत्तेच्या हाताखाली. ‘अब की बार 400 पार’ हा नारा संविधान बदलण्यासाठी होता, असे स्पष्ट संकेत आता मिळत आहेत.


हरिदास भिसे
मो. 9923742372

**नेपाळ, श्रीलंका, बांगलादेशचा धडा :-** गेल्या काही वर्षांत उपखंडातील अनेक देशांत जनआक्रोश उसळला. संसद, राष्ट्रपती भवने जाळली गेली. कारण एकच, भावनिक विषयांचा वापर, पण बेरोजगारी-शिक्षण-आरोग्य याकडे दुर्लक्ष. माध्यमे व न्यायसंस्था गुलाम. लोकांच्या मूलभूत गरजा पायदळी. भारतामध्येही ही परिस्थिती निर्माण होत चालली आहे. ब्राह्मणी वर्चस्वाचा कब्जा. भारतात केवळ 3.5टक्के असलेला ब्राह्मण वर्ग 79टक्के सत्तास्थानांवर आहे. भाजप आणि काँग्रेस दोन्ही ब्राह्मणधार्जिणे पक्ष. मुस्लिमविरोध हा फक्त बहुजन समाजाला विभागून ठेवण्यासाठीचा आडोसा. खरा संघर्ष आहे 15टक्के सत्ताधारी विरुद्ध 85टक्के बहुजन.

**नेपाळच्या आंदोलनातून शिकण्यासारखे :-** हक्कांसाठी संघर्षाशिवाय पर्याय नाही. संविधान पूर्ण ताकदीने राबवले, तर भारत महासत्ता बनेल. बहुजनांनी आपला खरा शत्रू ओळखला पाहिजे.
जातिव्यवस्था आणि ब्राह्मणी वर्चस्व :- भारताची परिस्थिती धुमसत्या आगीसारखी आहे. बेरोजगारी, महागाई, विषमता आणि जातीय अन्याय या सर्वांचा स्फोट लवकरच होऊ शकतो. ‘ही आजादी झुटी आहे, खरी आजादी हवी असेल, तर जागरूक नागरिक म्हणून संघर्ष अनिवार्य आहे.’ ■ ■

# देशाची दिशाहीन वाटचाल अभ्यासक आणि विश्लेषक

योग्य नियोजना अभावी भारतीय जनता रोजगार, नोकरी, महागाईने त्रस्त झाली. तरुणाच्या हाताला काम नाही. ‘खाजगी शाळा खिसा खाली’ असे शिक्षण झाले. पीडित समाजाला आरक्षणामुळे शासन आस्थापनेची आशा असतांना सरकारने सरकारी आस्थापणे कमी केली. कवडीमोल विकली आरक्षणावर गदा आणली. काही आस्थापनातील सरकारी गुंतवणूक काढली. मोठ्या उद्योगपतींच्या खाजगीकणास सरकारने स्वतः प्रोत्साहित केले. लहान, मध्यम व्यापारी डबघाईस आणले. लोकशाहीत भांडवलशाही, एकाधिकारशाही, हुकूमशाहीला चालना दिली.



सत्तेचा गैरवापर सुरू केला. प्रत्येक भारतीयाला गहाण ठेवून सरकारने दरडोई 4.8 लक्ष कर्ज काढले जनता कर्जबाजारी करून कर्जाच्या भरवशावर जगात देशाला 4 थ्या क्रमांकाची आर्थिक सत्ता घोषित करण्यात पुरूषार्थ कोणता? सरकारच्या जीएसटी दर वाढिने देशात आक्रोश वाढला. आता सीएसटी दर कमी झाले. म्हणजे आधी वाढवले हे खरे ठरले. आंधळ्याच्या हातात तलवार धोका असतो तसे अनाड्याच्या हातात सत्तेत आहे.

**विद्या व्यासंग**


प्राचार्य भाऊ वासनिक
9423606064

शिक्षणामुळे समाज जागृतीच्या मार्गी लागला. बरे वाईट समजायला लागला यास मनुस्मृतीने डिवचले तर मनुस्मृती लादणारे आधी आडवे पडतील. नंतर मनुस्मृती आडवी पडेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाचा ‘अत्त दिप भव’ महामंत्र समाजाला देतांना ‘शिकवा, संघर्ष करा, संघटित व्हा.’ मेंढरासारखे जगण्यापेक्षा पुरुषार्थाने जगण्यास शिकवले. संविधानकार प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांच्या मनात, तनात विचारात, स्वाशात, रक्ताच्या थेंबाल परिवर्तन हक्क, अधिकार, विकास भरला. डॉ. बाबासाहेबांचे स्मरण कोट्यावधी लोकांच्या जगण्याचा आधार आहे. त्यांचे विचार देशाच्या नवनिर्मितीची, विकासाची दिशा आहे. त्यांचा अपमान करणाऱ्यांना देश माफ करणार नाही. ■ ■

# तरुणांचे राजकारण आणि राजकारणातील तरुण

हल्ली तरुणांना केंद्रस्थानी ठेवून म्हातारे लोक राजकारण करत आहेत. रोजगार, उद्योग यावर बोलतांना भर दिला जातो. परंतू प्रत्यक्षात कोणतेही काम केले जात नाही. खरे पाहिले तर राजकारणाच्या माध्यमातून माणूस व देश समृद्ध केले जायला पाहिजे, विकास व विशेष शिक्षण, आरोग्य, रोजगार यावर भर देऊन राजकीय धोरणांची आखणी व्हायला पाहिजे. पण सध्या तसे न होता शिक्षणावर तर कोणी बोलत नाही, रिक्षा चालवणे, वडापाव विकणे याला रोजगार समजले जाते व त्याची जाहिरात केली जाते. जागतिक पातळीवर भारतीय शिक्षणाचा दर्जा काय? भारतात गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळते का? शिक्षणात गुणवत्ता वाढण्यासाठी काय केले पाहिजे? शिक्षित तरुणांनी वडापाव विकायचे का? शासकीय क्षेत्रातील नोकर भरती का केली जात नाही? लोकसंख्येच्या प्रमाणात शासकीय क्षेत्रात मनुष्य बळ आहे का? यावर कोणीही राजकारण करायला तयार नाही. राजकारण म्हणजे केवळ आपल्या दहा पिढ्यांची कमाई करून ठेवायची आणि देशातील जनतेला भिकेला लाऊन देशाची अधोगती करायची हेच धोरण सर्वच पक्षाचे दिसून येते. आमदार-खासदारांच्या पगारात, सुविधेमध्ये वाढ होते तेव्हा कोणीच आवाज उठवत नाही. गप्प राहून सर्व जन स्वतःची झोळी भरून घेतात. परंतु शिक्षण, रोजगार, आरोग्य यावर बोलायचे तर वेगवेगळ्या प्रकारचे राजकारण करून समिती स्थापन करु, निधी उपलब्ध नाही अशा प्रकारची भाषा वापरून मुख्य विषयांकडे दुर्लक्ष केले जाते. शेतकऱ्यांची जमीन संपूर्ण पाण्याखाली गेली असताना, शेतकऱ्यांकडे दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसताना शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्याची वेळ आल्यानंतर शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्त झालेल्या जिवनाचे राजकारण केले जाते. तेव्हा राजकीय पक्ष आणि राजकीय नेते सर्वसामान्य लोकांच्या समस्येविषयी किती गंभीर आहेत हे दिसून येते. देशाचा विचार केला जवळपास पन्नास लाख कोटी रुपयांचे बजेट चालू वर्षाचे आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर जवळपास सात लाख कोटी रुपयांचे बजेट आहे. हा आकडा सर्वसामान्य लोकांच्या कल्पनाशक्तीच्या बाहेरचा आहे. एवढे मोठे बजेट एका वर्षासाठी असताना पैसा नेमका खर्च होतो कुठे? याचा हिशोब खरच जनतेला मिळतो का? बरं हा सर्वच पैसा जनतेचा आहे हे तरी जनतेला कळते का? याविषयी जनता किती गंभीर आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळणेच अवघड आहे. रस्ते, पुल, मेट्रो वाढत आहे असे भासवले जात आहे. कारण मोठमोठे रस्ते, पुल, मेट्रो हजारो करोडो रूपये खर्च करून तयार करण्यात आले. परंतु बरेच बांधलेले कामे उद्घाटना अगोदर, उद्घाटन झाल्यावर एक दोन महिन्यांत खराब व्हायला लागले. मग प्रश्न पडतो निकृष्ठ दर्जाचे काम करून हजारो करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला जातो. त्या देशात तरुणांचे भविष्य काय असेल याची कल्पना न केलेली बरी. भ्रष्टाचार करून देशाला



भिकेला लावणारे राजकारण सुरू असताना तरुणांच्या हिताचे राजकारण होणे शक्य नाही. तरुणांनी भ्रष्टाचार, शिक्षण, आरोग्य, रोजगार यावर बोलुच नये. देशाचा शाश्वत विकास व तरुणांचे कल्याण काय असते हे तरुणांना समजूच नये. म्हणून राजकारणाच्या माध्यमातून तरुणांच्या डोक्यात जात-धर्म बळकट केला जातो. तरुणांना रोजगार, शिक्षण, आरोग्य आपेक्षा धर्म आणि स्वतःची जात जास्त प्रिय वाटायला पाहिजे अशी वक्तव्य राजकीय नेत्यांकडून केली जातात. मग काय सामाजिक ताणतणाव निर्माण तर होतोच, पण ज्याच्या हातात कुटुंबाची जबाबदारी आणि देशाचा कारभार असायला पाहिजे अशी सर्वसामान्य तरुणाच्या हातात दगड, धोंडे आणि रहायला तुरुंग मिळतो. जाती धर्मावरून भडकावणारे नेते दंगलीनंतर जमानतीही घ्यायला तयार होत नाहीत. जे नेते शेतकऱ्याने गळ्याला फास घेतला तरी धावून येत नाहीत, औषधोपचार न मिळाल्याने मृत्यू झाला तरी मदतीसाठी समोर येत नाही. अनलिमिटेड डाटा देऊन तरुणांना आभासी दुनियेत ढकलणारे सरकार तरुणांना उदरनिर्वाहासाठी मदत करत नसेल आणि प्रत्येक काम हे कमी पगाराचे, कंत्राटी करून नियमित पगार, सुविधा आणि भविष्य निर्वाह निधी अर्थात पिएफ बंद करून मात्र स्वतःचे पगार वाढ, भरभक्कम पेन्शन, चारशे रूपयात अनलिमिटेड कॉल असताना टेलिफोनसाठी प्रतिमहिना दहा रुपये. विमान प्रवास व भवनात अत्यंत स्वस्त पण गुणवत्तापुर्ण जेवन व्यवस्था.. ज्या सुविधा राजकारणातील लोकांनी जनतेला द्यायला पाहिजे तेच लोक जनतेला लूटून स्वतः उपभोग घेत आहेत. पाण्यामध्ये सर्वकाही वाहून गेल्या नंतर शेतकऱ्यांना थोडेसे अन्न आणि जगण्यासाठी पाच हजार रुपये देणारे नेते मात्र मोबाईलसाठी महिना दहा हजार रुपये घेत असतील आणि जनतेला फोन करणे सोडा. पण जनतेने केलेला फोनही उचलत नसतील तर राजकारणी किती इमानदार आणि नितीवान असतील याची खात्री पटते. आज देशातील तरुण हे अज्ञानी व सुस्त होत चालले आहेत. व्यक्ती व देशासमोर संकटाचा डोंगर उभा असताना तरुणांना पद्धतशीरपणे बाजूला सारून समस्येमध्ये आनंद व्यक्त करण्याची परिस्थिती निर्माण केली जात आहे. धर्मांध, अज्ञानी व सुस्त तरुण देशाच्या व समाजाच्या प्रगतीसाठी बाधक ठरत असतात आणि हिच बाधक परिस्थिती राजकारण्यांनी तयार करून ठेवली आहे. देशातील गलिच्छ राजकारणाची प्रतिमा सुधारण्यासाठी, तरुणांच्या उर्जेला गती मिळून तरुणांना रोजगार व विकासाची साधने निर्माण करून देण्यासाठी. माणसाची ओळख जाती धर्मावरून नाही तर माणुस म्हणून कर्माने होण्यासाठी सुशिक्षित आणि जागृत तरुणांनी राजकारणात सक्रिय होणे आवश्यक आहे. जागृत व हक्क अधिकाराची भाषा बोलणारा व्यक्ती कोणत्याही राजकीय पक्षांना नको असतो.


विनोद सदावर्ते
मो. 9130979300

राजकीय पक्षांना व नेत्यांना हुजरेगिरी करणारे आणि सतरंज्या उचलणारे मोठेपणासाठी वाटेल ते करणारे तरुण पाहिजे. म्हणजे त्यांचे बॅनर, स्टेज व सभेचे नियोजन फुकटात होते. राजकारणात सत्य व प्रामाणिक माणसाला फारसी किंमत मिळत नाही. उलट खोटे बोलुन फसवणाऱ्या आणि पैसे उकळणाऱ्या लोकांवर राजकारणी लोक लवकर विश्वास ठेवतात. परिस्थिती कशीही असली तरीही आता तरुणाईने राजकारणात शिरून राजकारणाचे समीकरण बदलून माणसासाठी व देशासाठी राजकारण करणे अत्यंत आवश्यक आहे. जाती, धर्म हे वैयक्तिक बाब असुन ते वैयक्तिक पातळीवरच असायला पाहिजे. तरुणांनी अंधविश्वास, थोतांड, पाखंड याला धर्माशी व जातीशी न जोडता विज्ञानवादी बनुन तर्कशुद्ध व मानवतावादी विचाराची पेरणी करावी. जेणेकरून समतेचे रोप तयार होऊन मानवेतेची सावली लोकांना मिळेल. म्हाताऱ्या लोकांनी तरुणांच्या भविष्याचा विचार न करता आता तरुणांनी वयस्कर प्रस्थापित नेत्यांना घरी बसून आराम करू द्यावा. कारण म्हाताऱ्या लोकांकडून काम करून घेणे व तरुणांनी बेरोजगार फिरणे हे ना संस्कारात बसत ना संस्कृती मध्ये बसत. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. तरुणांनी या निवडणूककडे परिवर्तनात्मक बघून सहभागी व्हावे. परंतु राजकारणात आणि चळवळीमध्ये स्वतःची घरे भरण्याची स्वप्न बघणाऱ्या तरुणांनी राजकारणापासून दुर रहावे. जो इमानदार आहे, स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी त्याच्याकडे साधन आहे, अशाच इमानदार, वैचारिक व जागृत तरुणांची आज राजकारणात गरज आहे. कोणत्याही नेत्यांचे वा संघटनेच्या गुलाम तरुणांनी राजकारणापासून दुर राहून प्रामाणिक लोकांना संधी द्यावी. तरच राजकारणाच्या माध्यमातून देशाची व समाजाची प्रगती होईल आणि खऱ्या अर्थाने तरुण समृद्ध होतील. ■ ■

“ एकाग्रता ही यशाची पहिली पायरी आहे... ”



# विज्ञान व मानवतेचा प्रकाशकिरण ‘अभियान’

## समाज घडविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुण कार्यकर्त्याला अभिवादन!

रामदास पेठ येथील निवासस्थानी लावलेल्या भिंतीवरील अभियान शशिकांत हुमणे यांचे छायाचित्र पाहताच मन गहिवरून येते. विज्ञान, विचार आणि समाजकार्याची दिशा दाखवणाऱ्या या तरुणाचा आज जन्मदिन, 7 ऑक्टोबर. लष्करीबाग या ऐतिहासिक वस्तीमध्ये सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कुटुंबात अभियानचा जन्म झाला. वडील शशिकांत हुमणे प्रशासकीय अधिकारी तर आई कांता हुमणे समाजकल्याण अधिकारी. आजी कौशल्याबाई समाजातील गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करणाऱ्या होत्या. घरातील हे संस्कार अभियानच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया ठरले.

**वर्ध्यात ‘नालंदा इन्स्टिट्यूट’ची स्थापना :-** सुखी-संपन्न घराण्यात जन्मलेला हा मुलगा स्वतःची वाट शोधत वर्धा येथे पोहोचला. फक्त सात महिन्यांच्या अल्पावधीत त्याने ‘नालंदा इन्स्टिट्यूट’ उभारून विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रासाठी आधुनिक प्रयोगशाळा उभी केली.



**प्रा. संध्या राजुरकर**
**निवासी संपादक**

शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण करणे, उपकरणांची ओळख करून देणे, प्रयोग करवून घेणे आणि हे सर्व स्वतःच्या श्रमाने व खर्चाने करणे, हेच त्याचे ध्येय होते. त्याने 20 वर्षांचा आराखडा तयार करून STEM शिक्षणाद्वारे नवसमाज निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले होते.

**मानवतावादी दृष्टिकोन आणि**



**7 ऑक्टोबर 1976 – 8 फेब्रुवारी 2019**
**अभियान शशिकांत हुमणे – विज्ञान, विचार आणि मानवतेचा दीपस्तंभ.**

**सामाजिक संवेदना :-** अभियान मानवाधिकाराचा कट्टर पुरस्कर्ता होता. दुर्बल घटक, मजूर आणि महिलांविषयी त्याचा दृष्टिकोन अत्यंत संवेदनशील होता. ऑटोचालकांना तो सन्मानपूर्वक ‘सर’ म्हणत असे. एकदा केरळच्या कोची येथे फिरतीवर असताना, एका ऑटो चालकाच्या मुलाला पुस्तके भेट दिली आणि त्या कुटुंबासाठी स्वतः ऑटो खरेदी करून दिला. त्या ऑटोवर आजही ‘अभियान’ हे नाव झळकत आहे.

**विज्ञानाची वाट – केरळ ते वर्धा :-** त्रिवेंद्रम येथे त्याने मित्रांच्या सहकार्याने ‘तक्षशीला वाचनालय’ सुरू केले, तर छत्तीसगडमधील राजनांदगाव येथे ‘नालंदा’ची शाखा उघडली. त्या परिसरात आजही 15 पेक्षा अधिक ‘अभियान वाचनालये’ कार्यरत आहेत.

मित्र अनुपकुमार हे वर्धेतील नालंदा अकॅडमीचे कार्य पुढे नेत आहेत. नागलोक, नागपूर येथेही त्याने तरुणांसाठी प्रेरणादायी शिबिरे आयोजित केली होती.

**अकाली विरह, पण अमर आठवण :-** 8 फेब्रुवारी 2019 रोजी या तेजस्वी तरुणाने जगाचा निरोप घेतला. उमेदीच्या वयात मुलाचे निधन हे कोणत्याही पालकासाठी असह्य असते. वडील शशिकांत हुमणे यांनी आपल्या मुलावर लिहिलेले गीत- ‘तू जीव तारकांचा, नित्य तेज द्यावे, हसणे तुझ्यामुळे सकळांना शक्य व्हावे...’ आजही त्यांच्या डोळ्यांत ओल आणते.

अभियानच्या निधनानंतरही त्याची आठवण वर्धा, केरळ आणि छत्तीसगड येथे आजही जिवंत आहे. त्याचे विचार, कार्य आणि विद्यार्थ्यांमध्ये पेटवलेला विज्ञानप्रेमाचा दिवा अजूनही तेवत आहे.

**समाजाला हवे आहेत अशा तरुणांचे ‘अभियान’ :-** अभियान शशिकांत हुमणे हे नाव केवळ एका व्यक्तीचे नाही, तर एका विचाराचे प्रतीक आहे. विज्ञान, माहिती तंत्रज्ञान, सामाजिक समता आणि मानवतेचा संगम त्यांच्या कार्यात दिसतो. त्यांच्या जिद्दीने आणि आत्मीयतेने उभा राहिलेला हा प्रवास आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आदर्श आहे. ■ ■

# मूलभूत गरजांचा आर्थिक सिद्धांत



**अर्थशास्त्रातील मूळ सिद्धांत; जो वर्षानुवर्षे विश्वमान्य आहे, त्याचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे असे वाटते. रोटी, कपडा और मकान या तीन अत्यावश्यक आणि मूलभूत गरजा आहेत अशी समाज मान्यता असून सैद्धांतिक मान्यता सुद्धा आहे. यातूनच पुढे आवश्यक गरजा आणि चैनीच्या गरजा असे गरजांचे वर्गीकरण करण्यात आले व या वर्गीकरणाला अनुसरुनच त्यापुढील अनेक सिद्धांत रुढ व दृढ झाले. पण याचा वेगळ्या दृष्टिने विचार केल्यास त्यामागे दडलेले सत्य प्रकाशात येते. रोटी, कपडा और मकान या मानवाच्या मूलभूत गरजा कशा काय होऊ शकतात; असा विचार मनात आला. मानव हा सुद्धा निसर्गातील एक प्राणी आहे.**

इतर प्राण्यांना सुद्धा कपडा सोडला तर अन्न आणि घरटे आवश्यक आहेत. त्या शिवाय ते जगू शकत नाही. तरी ही त्यांना अर्थशास्त्रातील कोणत्याही सिद्धांताची व तद्नुरूप धोरणाची गरज नाही. मानवेतर सर्व पशू पक्षी आपल्या गरजा वैयक्तिकपणे सोडवू शकतात. अगदी रानटी अवस्थेतील माणूस देखील या गरजा सोडवत होता. मग माणसाला अर्थशास्त्राची गरज काय? असा प्रश्न निर्माण होतो. याचे स्पष्टीकरण समजून घेण्यासाठी प्रथम गरजांचे पुनर्वर्गीकरण करावे लागेल. अन्न आणि निवारा या आवश्यक गरजा नसून त्या नैसर्गिक गरजा आहेत; जसे हवा आणि पाणी आहे. हवा, पाणी, अन्न व निवारा या चार नैसर्गिक गरजांची पुर्ती करण्यासाठी प्रत्येक सजीव स्वतः प्रयत्नशील असतो; मग कुणी मदत करोत अथवा ना करोत. यासाठी त्याला धडपड करावीच लागते. येथे त्याला इतर कुणाच्या मदतीची व अर्थशास्त्राची काही गरज नसते. पण याशिवाय मानवाला इतर काही गरजा आवश्यक वाटतात आणि तेथून अर्थशास्त्राची सुरूवात होते. माणसाला नुसते जिवंत रहायचे नसते तर चांगल्या प्रतीचे जीवन जगायचे असते. त्यासाठी वेगळ्या प्रयत्नांची गरज असते. माणसाला हवा, पाणी पाहिजे पण ते स्वच्छ असावे. अन्न, निवारा पाहिजे पण ते मनासारखे असावे. यासाठी मग वेगळ्या नियोजनबद्ध व सामुहिक प्रयत्नांची गरज असते. परस्परांचे हितसंबंध बाधक ठरू नये यासाठी कल्याणकारी नियम व योजनांची गरज असते. येथून अर्थशास्त्राची सुरूवात होते.

मानवी जीवनाशी संबंधित कल्याणकारी नियम व सुयोग्य योजना तयार करण्यासाठी सामाजिक जिवनावश्यक गरजांचे वर्गीकरण करणे क्रमप्राप्त ठरते.



**प्रा. डॉ. भीमराव गोटे**
**9822235029**

त्या गरजा कोणत्या? सद्या हवा, पाणी व कपडे बाजुला ठेवून इतर गरजांचा विचार करूया. मानवाला सूस्थितीत जीवन जगण्यासाठी अन्न व निवारा यासोबतच शिक्षण, आरोग्य सुविधा आणि रोजगार या तीन आवश्यक व मूलभूत गरजा आहेत आणि त्यासाठी वीज व रस्ते सुद्धा आवश्यक आहे; हे लक्षात घेऊन सरकारने यावर लक्ष केंद्रित करून त्यासंबंधी आर्थिक नियोजन करणे आवश्यक आहे. अर्थ संकल्पात यासाठी योजनाबद्ध तरतुद करायला हवी. परंतु आपल्या देशाचे विद्यमान सरकार भांडवलदारांचे बटीक म्हणून राबत असल्याचे दिसून येते. माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले होते; मोदींनी सरकारी कंपन्या खाजगी केल्या. सरकारी शाळा बंद पाडल्या. खाजगी विद्यापीठ, महाविद्यालय उघडण्याचा सपाटा सुरू केला. ग्रामीण मार्गात मोजता येत नाही; इतके खड्डे आहेत; पण उद्योजक व भांडवलदारांसाठी महामार्गांचे ‘समृद्धीकरण’ केले. एस.टी. महामंडळाची वाट लागली व खाजगी बस वाहतूक प्रगतीपथावर आहे. सरकार स्वतः वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य या जीवनावश्यक व कल्याणकारी योजनांची जबाबदारी झटकून त्यातून मुक्त होत आहे आणि खाजगी उद्योजकांना सामान्य जनतेची आर्थिक लूट करण्याचे मार्ग मोकळे होत आहे. सरकारी दवाखान्यात सुद्धा आता शुल्क आकारले जाऊ लागले.

वास्तविक पाहता शैक्षणिक संस्था, विद्यापीठ, महाविद्यालय आणि शाळांचे व शिक्षणाचे राष्ट्रीयकरण करायला हवे. जिल्हा, तालुका आणि ग्रामीण स्तरावर सरकारने दवाखाने सुरू करायला हवे. देशात समानता प्रस्थापीत करण्यासाठी संपूर्ण देशभर एकसमान अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके असणे आवश्यक आहे. शिक्षण हे व्यक्ती, समाज आणि राष्ट्र घडविण्याचे एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. म्हणून देशातील मुला मुलींना दर्जेदार शिक्षण देऊन एक सक्षम राष्ट्र घडवायला हवे. पण सत्ता पिपासू राजकीय नेते शिक्षणाच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक विषमता निर्माण करीत आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून धार्मिक निरपेक्षता व राष्ट्रीयता निर्माण करण्याऐवजी जातीय व धार्मिक द्वेष वाढविण्याचे कारस्थान करीत आहे. याचे परिणाम सामान्य लोकांनाच भोगावे लागत आहे. याचा सामान्य लोकांनीच विचार करायचा आहे. ■ ■

# शेतकरी अस्मानी संकटाने ग्रस्त, जिल्हाधिकारी नाचण्यात व्यस्त...!

इसध्या महाराष्ट्र अस्मानी संकटाच्या विळख्यात असून शेतकरी या संकटाने ग्रस्त आहे. तो एवढा हवालदिल आणि निराधार झाला आहे की तो आत्महत्या करतो आहे. पावसाने कहर केला असून पूरपरिस्थीने सर्वत्र हाहाःकार माजला आहे. शेतकऱ्यांची घरे, जनावरे वाहून गेली आहेत. जमीन खरडून गेली आहे आणि पूरग्रस्त लोक गेल्या तीन चार दिवसांपासून उपाशी आहेत. ते असाह्य आणि बेघर झाले आहेत. अशा परिस्थितीत शासन व प्रशासनाने आपली सर्व कामे, कार्यक्रम बाजूला ठेऊन या पूरग्रस्तांना दिलासा देण्यासाठी प्राधान्याने त्यांच्या मदतीला धावून गेले पाहिजे हे त्यांचे आद्यकर्तव्य तर आहेच पण ती त्यांची संवैधानिक जबाबदारी आहे.

मात्र धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी नवरात्रोत्सव महोत्सवाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात नाचण्यात व्यस्त असल्याचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे. त्यामुळे भारतीय प्रशासन सेवेसारख्या उच्च कोटीच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन आणि प्रशिक्षण घेऊन जे अधिकारी प्रशासनाच्या माध्यमातून लोकसेवेत येतात आणि आपल्या अधिकाराचा वापर जनतेच्या हितासाठी करण्याचे व्रत घेतात, तशी शपथ घेतात. त्या जिल्हाधिकारी पदावर कार्य करणाऱ्या अधिकाऱ्याने लोकांप्रती एवढे असंवेदनशील असू नये.

मला याठिकाणी धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती पुजार यांना सुचवायचे आहे की, साहेब इतर प्रसंगी एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमात उपस्थित राहून नाचगाण्यात सहभाग घेणे हे समजू शकते. पण सध्या आपल्या जिल्ह्यात अतिवृष्टीने आणि महापुराने जे थैमान घातले आहे, शेतकरी संकटात आहे अशा प्रसंगी आपण आपल्या कर्तव्याला प्राधान्य दिले पाहिजे एवढी नैतिकता आय.ए.एस. उत्तीर्ण झालेल्या सर्वोच्च प्रशासकीय सेवकाला असणे काळाची गरज आहे.



कारण आपण संपूर्ण जिल्ह्याचे प्रशासकीय प्रमुख आहात. आपल्या माध्यमातूनच लोकांना शासकीय सेवा प्रदान करून आणि योजनांच्या अंमलबजावणीतून आपण लोकांचे जीवनमान सुधारू शकता आणि देशाचा विकास साध्य करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकता याची आपण जाणीव ठेवली पाहिजे.

देशातले आय.ए.एस. अधिकारी कसे असावे याबाबत मी आमचे मार्गदर्शक, लेखक, प्रेरणादायी व्याख्याते आणि जीवनभर प्रामाणिकपणे आपल्या पदाचा वापर जनतेच्या हितासाठी, त्यांच्या कल्याणासाठी, लोकांचे जीवनमान सुधारावे यासाठी आपली सेवा देणारे तामिळनाडू राज्याचे प्रधान सचिव म्हणून सेवानिवृत्त झालेले आय.ए.एस. अधिकारी आदरणीय विश्वनाथ शेगावकर यांचे उदाहरण देऊ इच्छितो.



**प्रा. डॉ. एम. आर. इंगळे**
**मो. 9423429060**

मा. विश्वनाथ शेगावकर यांनी 1985 मध्ये आय. ए. एस. ही परीक्षा उत्तीर्ण केली आणि ते तामिळनाडू राज्यात जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त झाले होते. त्यांनी आपल्या पदाचा संपूर्ण उपयोग लोकांचे प्रश्न सोडवून त्यांचे जीवनमान उंचावेल यासाठी केला. त्यांनी लोकाभिमुख प्रशासन चालवून लोकांच्या मनात आपला आदर कायम केला. ते म्हणतात, आय.ए.एस. ही सेवा चालती बोलती कल्याणकारी संस्था आहे. त्यामुळे ही सेवा लोकाभिमुख असावी. केवळ लाल दिव्याची गाडी भेटते म्हणून नव्हे तर लोकसेवेसाठी ही सेवा स्वीकारावी. या सेवेतून आपण आपले जीवन तर बनवतोच, पण या सेवेच्या माध्यमातून आपण इतर लोकांचे जीवन सुद्धा बनवू शकतो आणि त्यासाठीच ही सर्वोच्च सेवा केली पाहिजे.

ते पुढे म्हणतात की, आपले जिल्हाधिकारी किंवा आय.ए.एस. हे पद सामान्य लोकांवर लादू नका. तर आपण या परीक्षा पास करून सर्वोच्च प्रशासन सेवेत येतो. या पदाचा वापर करून जनहिताची धोरणे ठरवून त्याची अंमलबजावणी करू शकतो आणि लोकांचे जीवन सुखकर करू शकतो. हा भाव आपल्या या सेवेत आपण बाळगला पाहिजे. त्यांनी आपल्या अनुभवाचे गाठोडे आपल्या मॅरॅथॉन या ग्रंथात गुंफले आहे ते भारतातील सर्व आय. ए. एस. अधिकाऱ्यांनी जरूर वाचावे म्हणजे त्यांना आपल्या पदाचे मोल कळेल असे मला वाटते.

देशात आणि महाराष्ट्रात आलेल्या या अस्मानी संकटाला आपण सर्वांनी धैर्याने तोंड दिले पाहिजे. शासन प्रशासनाने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून आपदग्रस्त लोकांना धीर दिला पाहिजे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यक ती मदत केली पाहिजे. तसेच लोकांना सहाय्य करण्याचे आवाहन पाहिजे आणि देशाला व महाराष्ट्राला आणि समस्त भारतीयांना पुन्हा एकदा नव्याने उभे राहण्याचे बळ दिले पाहिजे हीच सदिच्छा. जय महाराष्ट्र, जय भारत, जय संविधान...! ■ ■

# भारतीय समाज आणि आरक्षण

**भारतीय समाजामध्ये आरक्षण हा गेल्या काही दशकांपासून कायम वादग्रस्त आणि चर्चेचा विषय राहिला आहे. अलीकडे कोणत्याही जात-धर्मातील लोकांनी ‘आम्हालाही आरक्षण हवे’ अशी मागणी पुढे आणायला सुरुवात केली आहे. मागणी करणे हा प्रत्येकाचा नैतिक अधिकार असला, तरी ती योग्य-अयोग्य ठरवून निर्णय घेणे ही सरकारची जबाबदारी आहे.**




**इअनुशेष पदे का रिक्त?**
संविधानाने अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, भटक्या-विमुक्त आदी मागासवर्गीयांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी आरक्षणाची तरतूद केली. परंतु आजही अनेक सरकारी कार्यालयांत मोठ;91 प्रमाणावर अनुशेष पदे रिक्त आहेत. सरकारकडून थेट भरती टाळून कंत्राटी पद्धतीने काम करवून घेतले जाते. कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन न मिळाल्याने ते उपासमारीच्या काठावर काम करण्यास मजबूर होतात. अशा परिस्थितीत आरक्षणाचा मूळ हेतूच संपल्यागत दिसतो.

**सत्ताधाऱ्यांची उदासीनता :-** आमदार-खासदार-मंत्र्यांच्या मुलांना आरक्षणाची गरज नसते. त्यामुळे अनुशेष पदे भरली गेली किंवा नाही, याची त्यांना चिंता नसते. काही अपवाद वगळता बहुतेक सत्ताधारी याकडे दुर्लक्ष करतात. आज 85 टक्के लोकसंख्या असलेल्या मागासवर्गीय समाजाचा अनुशेष का भरला जात नाही, हा गंभीर संशोधनाचा विषय आहे.

**लोकांची नाजूक परिस्थिती :-** संविधान लागू होऊन 75 वर्षे उलटली तरी मागासवर्गीयांची सामाजिक-आर्थिक परिस्थिती फारशी सुधारलेली नाही. आजही 80 कोटी लोकांना स्वस्त धान्य योजना आणि मोफत धान्य घ्यावे लागत आहे. सरकारलाच लोकांची नाजूक परिस्थिती मान्य आहे, मग अनुशेष पदे न भरण्याचे कारण काय, हा प्रश्न कायम राहतो.



**अविनाश टिपले**
**मो.9970917389**

**नेत्यांची संपत्ती आणि लोककल्याण :-** दुसरीकडे, काही आमदार-खासदारांची संपत्ती अल्पावधीत झपाट्याने वाढत आहे. जर खरेच ते लोककल्याणासाठी राजकारण करत असतील, तर संपत्ती वाढीचा तो ‘फार्मुला’ जनतेला सांगावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

**मराठा विरुद्ध ओबीसी आरक्षण वाद :-** मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाने आरक्षणासाठी उभारलेले आंदोलन मोठे झाले. सरकारने ‘ओबीसी मराठा’ असा पर्याय देण्याचा निर्णय घेतल्यानंतर ओबीसी समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली. परिणामी, ओबीसी आणि मराठा यांच्यात स्पर्धा व संघर्ष सुरू झाला. परंतु प्रत्यक्षात सरकारी भरतीतच घट झाल्याने आणि कंत्राटी पद्धत वाढल्याने आरक्षणाचा खरा लाभ कुणाला मिळणार, हा चिंतनाचा विषय आहे.

**संविधानाचा खरा हेतू :-** आज भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे ओबीसी समाजातून, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या अनुसूचित जमाती समाजातून आणि सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई हे अनुसूचित जाती समाजातून आलेले आहेत. या तिघांचे उदाहरण शिक्षण, बुद्धिमत्ता आणि संविधानाच्या तरतुदींमुळे शक्य झाले आहे. संविधानाने प्रत्येकाला समान न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव दिला आहे. शासन आणि प्रशासनाने जात, पंथ, धर्म यांच्या आधारावर भेदभाव न करता न्याय द्यावा, हीच जनतेची अपेक्षा आहे.

आरक्षणाचा खरा फायदा दुर्बल घटकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. अनुशेष पदे भरून काढणे, बेकायदेशीर संपत्तीवर कारवाई करणे आणि संविधानाच्या तरतुदींचे प्रामाणिक पालन करणे, हे सरकारचे कर्तव्य आहे. लोकशाहीत आंदोलन आणि विरोध कायम राहतीलच, पण शेवटी लोकांचा सामाजिक-आर्थिक विकास हाच उद्देश साध्य झाला पाहिजे. ■ ■

# डॉ. आंबेडकरांच्या महानतेची साक्ष उद्यांचा इतिहास देईल


डॉ. आंबेडकरांच्या महानतेची साक्ष उद्यांचा इतिहास देईल
शनिवारवाड्यापुढील विराट सभेत आचार्य अत्रे यांची घोषणा
धर्म आणि सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड पुकारणारा भारताचा भीमपुरुष

## शनिवारवाड्यापुढील विराट सभेत आचार्य अत्रे यांची घोषणा

भारताच्या गेल्या तीस-चाळीस वर्षांच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा बंडखोर आणि चारित्र्यसंपन्न नेता निर्माण झालेला नाही. धर्म, व्यवस्थेतील गुलामगिरी विरुद्ध बंड करणाऱ्या निर्भय आणि कर्तृत्ववान महापुरुषांच्या यादीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव भारतीय इतिहासात सर्वोच्च स्थानी आजरामर राहिल, अशा शब्दांचे उद्गार आचार्य अत्रे यांनी शनिवारवाड्या पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ब्राह्मणांच्या बालेकिल्ल्यात भरसभेत भाषण करताना काढले होते.

आपल्या भाषणात आचार्य अत्रे पुढे म्हणाले की, दुसऱ्या गोलमेज परिषदेच्यावेळी महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्धिक रणसंग्रामात आंबेडकरच श्रेष्ठ ठरतात. असा उद्याचा इतिहास निर्वाळा देईल. गांधीजींनी मुसलमान, ख्रिस्ती, अँग्लो इंडियन यांना स्वतंत्र मतदार दिले. पण अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यासाठी नकार दिला.

ते म्हणाले की, सात कोटी अस्पृश्य हे मुसलमान किंवा ख्रिश्चन झाले तरी चालतील, पण मी हिंदु समाजात दोन मतदार संघ होऊ देणार नाही.

आचार्य अत्रे म्हणाले की, शत्रूला पण जीवदान देणारा महान नेता होणे नाही.

डॉ. आंबेडकरांनीच महात्मा गांधींचे प्राण वाचवले हे भारत कधीही विसरणार नाही.

धर्म आणि सामाजिक गुलामगिरी विरुद्ध बंड पुकारणारा भारताचा भुमिपुत्र असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आचार्य अत्रे म्हणाले. ■ ■

■ ■ बसौसे ■ ■

# रेबीज प्रतिबंधासाठी लसीकरण महत्वाचे

**जग रेबीज प्रतिबंध आणि नियंत्रणाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक रेबीज दिन साजरा करते. हा दिवस पहिली रेबीज लस विकसित करणारे लुई पाश्चर यांच्या पुण्यतिथीनिमित्त देखील साजरा केला जातो. या वर्षीची थीम, ‘आता कृती करा - तुम्ही, मी, समुदाय’, आपल्याला आठवण करून देते की रेबीज नष्ट करणे ही एका व्यक्तीची किंवा गटाची जबाबदारी नाही - त्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे, अशी माहिती प्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट आणि वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरोलॉजीचे विश्वस्त पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी दिली.**

त्यांनी रेबीज प्रतिबंधासाठी संपर्कापूर्वी आणि संपर्कानंतर लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. रेबीज हा सर्वात घातक विषाणूजन्य संसर्ग आहे. ज्यामध्ये जवळजवळ 100टक्के मृत्यू होतात आणि 99टक्के प्रकरणांमध्ये तो प्रामुख्याने कुत्र्याच्या चाव्याद्वारे पसरतो. रुग्णांना चावल्यानंतर 20 ते 60 दिवसांत लक्षणे दिसून येतात, परंतु कधीकधी 2 वर्षांनीही. वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरोलॉजीच्या ट्रॉपिकल न्यूरोलॉजी ग्रूपचे अध्यक्ष आणि होंडुरासचे न्यूरोलॉजिस्ट प्रोफेसर मार्को मेडिना म्हणाले की, फ्युरियस रेबीजचे रुग्ण सरासरी 5.7 दिवस जगतात. तर पॅरालिटिक रेबीजचे रुग्ण 11 दिवस जगतात. ते पुढे म्हणाले की, कोणताही उपचार नसल्याने, रेबीज नियंत्रणासाठी आपल्याला समुदाय, कुत्र्यांचे मालक, शिक्षक, माध्यमे, धोरणकर्ते, संशोधक, पशुवैद्य, वैद्यकीय कर्मचारी आणि लसीकरण क्लिनिक यांच्याकडून सहयोगी प्रयत्नांची आवश्यकता आहे.

वेळेवर लसीकरण आणि जागरूकता निर्माण केल्यास, रेबीज हा 100टक्के प्रतिबंध करण्यायोग्य आजार असला तरी, जगात दरवर्षी सुमारे 60000 ते 70000 लोक रेबीजमुळे मृत्यू होतात आणि एकट्या भारतात 20000 मृत्यू होतात. 15 वर्षांखालील मुलांना याचा सर्वाधिक धोका आहे. हा आकडा खूपच जास्त असेल. कारण अनेक रुग्ण निदान न होता मरतात आणि अनेकांची नोंद होत नाही. 90टक्के मृत्यू ग्रामीण भागात होतात.



रेबीज ही भारतातील एक प्रमुख सार्वजनिक आरोग्य समस्या आहे आणि ती देशभरात स्थानिक आहे. भारतात, भटक्या कुत्र्यांच्या जास्त संख्येमुळे, दर 2 सेकंदाला एक कुत्रा चावतो. गेल्या वर्षी भारतात कुत्र्यांच्या चाव्याचे 37 लाख प्रकरणे नोंदवली गेली. म्हणजे दररोज कुत्र्यांच्या चाव्याचे 10000 प्रकरणे नोंदवली गेली. रेबीज हा मानवजातीला ज्ञात असलेल्या सर्वात जुन्या आजारांपैकी एक आहे आणि आदर्शपणे, 21 व्या शतकात कोणत्याही माणसाला रेबीजमुळे मृत्यू येऊ नये. परंतु भारतात दर 25 मिनिटांनी रेबीजमुळे एकाचा मृत्यू होतो, अशी माहिती डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी दिली. कुत्र्यांचे लसीकरण, कुत्र्यांच्या चावल्यानंतर चांगल्या उपचारांची उपलब्धता, लसीकरण आणि प्राण्यांच्या चाव्याचा धोका कमी करणे हे रेबीज नियंत्रणासाठी महत्त्वाचे घटक आहेत, असे ते म्हणाले. गेल्या महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांना सामान्य आश्रयस्थानांमध्ये हलवण्याचा एक अतिशय महत्त्वाचा निर्णय दिला होता आणि तो देशभरात लागू केला पाहिजे आणि त्याकरिता सर्वांनी सहकार्य पाहिजे.



**डॉ. चंद्रशेखर मेश्राम**

प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय आहे

1. पाळीव प्राणी आणि भटक्या कुत्र्यांना लसीकरण करा - यामुळे त्यांच्या स्त्रोतापासूनच प्रसार थांबतो. 2. धोकादायक संपर्क टाळा - मुलांना अज्ञात प्राण्यांशी खेळू नका असे शिकवा. 3. जखमेची तात्काळ काळजी - कोणताही चावला किंवा ओरखडा किमान 15 मिनिटे साबण आणि पाण्याने धुवा. 4. वैद्यकीय मदत लवकर घ्या - पोस्ट-एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस (पीईपी) लस जीव वाचवतात. 5. सामुदायिक मोहिमेला पाठिंबा द्या - स्थानिक लसीकरण आणि जागरूकता मोहिमांमध्ये सहभागी व्हा.

या वर्षीची थीम ‘आताच कृती करा-तुम्ही, मी, समुदाय’ सामूहिक कृतीची शक्ती अधोरेखित करते.

तुम्ही - कुत्रा चावल्यानंतर काय करावे हे जाणून स्वतःचे आणि तुमच्या कुटुंबाचे रक्षण करा.

मी - एक जबाबदार पाळीव प्राणी मालक व्हा आणि तुमच्या पाळीव प्राण्यांचे लसीकरण झाले आहे याची खात्री करा.

समुदाय - कुत्र्यांना लसीकरण करण्यासाठी, जागरूकता वाढवण्यासाठी आणि रेबीज नष्ट करण्यासाठी सरकारी कार्यक्रमांना पाठिंबा देण्यासाठी एकत्र काम करा. जागतिक आरोग्य संघटना (WHO) आणि त्यांच्या भागीदारांचे 2030 पर्यंत कुत्र्यांच्या मध्यस्थीमुळे होणाऱ्या रेबीजमुळे होणारे मानवी मृत्यू शून्य करण्याचे उद्दिष्ट आहे. समुदायाच्या अधिक सक्रिय सहभागामुळे, हे ध्येय गाठता येईल. ■ ■




## उर्वेला बुद्ध विहार

वडेगाव (विरली ग्रामपंचायत) ता. उमरेड, जि. नागपूर येथील बौद्ध नागरीकांनी स्वश्रमातून बुद्ध विहार निर्माण केले आहे. विहाराचे समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा व पंचशील झेंडा आहे. वर्षावासमध्ये भवतकुशल धम्मा सुनतरो भंते मागदर्शन करीत आहेत. वंदना पौर्णिमा उत्सव, धम्मचक्र प्रवर्तन दिन, बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. महिला मंडळाच्या सदस्या प्रिती शामकुवर, पुष्पा चव्हाण, प्रिया गजभिये, सोनम तिरपुडे, रेखा चव्हाण, ज्योती गवळी कार्यरत आहेत.

संवाद मित्र डी.आर. कांबळे
मो. 8600924170

### सोनम वांगचुक यांच्या अटकेच्या विरोधात

# बहुजन, आंबेडकरी, पुरोगामी संघटनांच्या बैठकीत निषेध



**नागपूर :** लडाखमधील पर्यावरण कार्यकर्ता, वैज्ञानिक आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी नागपूरमध्ये विविध सामाजिक संघटना, बहुजन चळवळीचे कार्यकर्ते, आंबेडकरी विचारवंत आणि पुरोगामी संघटना एकत्र आल्या आहेत. रविवारी पार पडलेल्या संयुक्त बैठकीत या अटकेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला असून, मंगळवारी 7 ऑक्टोबर रोजी 'हम भारत के लोग' या बॅनर अंतर्गत संविधान चौकात धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी केली आहे. बैठकीत उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी वांगचुक यांच्यावर झालेली कारवाई ही अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घातलेला आघात असल्याचे सांगितले. ते गेल्या अनेक वर्षांपासून लडाखमधील पर्यावरण, हिमालयीन पारिस्थितिक तंत्र आणि स्थानिकांच्या हक्कांसाठी लढत आहेत. त्यांच्यावर रासुका अंतर्गत कारवाई करीत झालेली अटक ही अन्यायकारक असल्याची भावना प्रत्येकाने व्यक्त करीत याचा निषेध केला. याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी संविधान चौकात एक दिवसीय धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. रविभवन येथे पार पडलेल्या या बैठकीत समता सैनिक दलाचे सुनील सारिपुत्त, प्रकाश दार्शनिक, बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे शंकर ढेंगरे, रिपाइं (आ)चे नेते भूपेश थुलकर, प्रकाश कुंभे, ज्येष्ठ नाटककार दादाकांत धनविजय, रिपब्लिकन फेडरेशनचे मिलिंद पखाले, नरेश वाहाणे, छाया खोब्रागडे, संभाजी ब्रिगेडचे सुधांशू मोहोड, सामाजिक कार्यकर्त्या अॅड. सुषमा भड, धम्मसंगिनी रमागोरथ, भारती सहारे, डॉ. प्रशांत कडू, अॅड. विनोद खोबरे, अॅड. सुशांत पाटील, प्रवीण कांबळे, सुधाकर पांडे, मीना भागवतकर आदींसह विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आम्ही भारताचे लोक आज धरणे आंदोलन करणार

**नागपूर :** पर्यावरणवादी सोनम वांगचूक यांची तातडीने निर्दोष सुटका करण्याच्या मागणीसाठी आम्ही भारताचे लोक यांच्यावतीने मंगळवार 7 ऑक्टोबर रोजी संविधान चौकात दुपारी 12 वाजेपासून एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना मागणीचे निवेदन सादर करण्यात येईल. यात सोनम वांगचुक यांनी बिनशर्त सुटका करावी. अटक केलेल्या नागरिकांचीही सुटका करावी, लडाखला सहाव्या अनुसूचिमध्ये सामील करण्यात यावे. या मागणीचा समावेश राहील. अशी माहिती रविवारी पत्रपरिषदेत प्रकाश दार्शनिक, सुधांशू मोहोड, सुनील सारिपुत्त, शंकर ढेंगरे, मिलिंद पखाले यांनी दिली. यावेळी भूपेश थुलकर, अरूण गाडे, नरेश वाहाने, प्रकाश कुंभे, राजन वाघमारे उपस्थित होते.

## भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण मध्य क्षेत्राच्या 40 व्या राष्ट्रीय नाट्य स्पर्धेचा समारोप



**नागपूर :** भारतातील रंगभूमी आणि जागतिक रंगभूमीचे समन्वये साधत माणसांच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक गरजांचा नव्या पिढीने सूक्ष्मतेने अभ्यास करून नव्या संहिता व सादरीकरणाच्या पद्धतीत नव निर्मितीच्या ध्यासातून पुढे येणे आज गरजेचे असल्याचे सुप्रसिद्ध नाटककार व दिग्दर्शक वीरेंद्र गणवीर यांनी नुकत्याच झालेल्या भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण मध्य क्षेत्र, नागपूर आयोजित चाळीसाव्या राष्ट्रीय नाट्य स्पर्धेतील समारोपीय पारितोषिक समारंभाच्या अध्यक्षीय भाषणातून आपले विचार मांडताना म्हटले. यावेळी रंगमंचावर के.के. बेहेरा (ओरिसा), मोहिनी साठे, सहसंयोजक नितीन नागमोते, ऐश्वर्या वर्मा प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे वीरेंद्र गणवीर म्हणाले, भारतीय रंगभूमीला जुन्या आणि पारंपरिक विषयांना पूर्णविराम देत आजच्या प्रश्नांना मुखवटे आपल्या लेखणीतून नव समाज निर्मितीचा प्राधान्य दिले आणि तांत्रिक दृष्टिकोनांतून सादरीकरणाच्या कल्पकतेचा विस्तार केला तर यातून भारतीय रंगभूमी जागतिक होण्याच्या दिशेने सरसावेल असा त्यांनी यावेळी विश्वास व्यक्त केला. 24 आणि 25 सप्टेंबर 2025 अशा दोन दिवस चाललेल्या राष्ट्रीय नाट्य स्पर्धेचे उद्घाटन श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांच्या हस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी जीएसआय मध्य क्षेत्राचे अप्पर महानिदेशक व विभाग प्रमुख दिनेश गणवीर प्रामुख्याने उपस्थित होते. शुभेंदु कुमार रॉय यांना दिग्दर्शनाचा सर्वोत्कृष्ट तर सुरजीत मत्राला उत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार मिळाला. भीष्मवध मधील शीतल इल्मे यांनी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार पटकाविला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी रमेश लखमापूरे, प्रा. सुपंथा भट्टाचार्य, डॉ. दीपलक्ष्मी भट यांनी काम पाहिले. दोन दिवस उत्साहात पार पडलेल्या या राष्ट्रीय नाट्य स्पर्धेला प्रेक्षकांनी प्रचंड गर्दी करीत नाटकाना प्रतिसाद दिला.

## भारतीय राज्यघटनेचा आम्हाला अभिमान : ना. संजय शिरसाट



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) तर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सामाजिक न्याय भवन येथे समता रॅली व आंबेडकरी विचारांच्या शाहिरी जलसाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सामाजिक न्यायमंत्री ना. संजय शिरसाट यांच्या हस्ते झाले. त्यांनी म्हणाले, 'डॉ. बाबासाहेबांनी आम्हाला माणूस करून उभे केले. भारतीय राज्यघटनेमुळे माझ्यासारखा माणूस मंत्रीपदी पोहोचला. आमच्या घटनेचा आम्हाला अभिमान आहे.'

कार्यक्रमास डॉ. हर्षदीप कांबळे, सुनील वारे, बबन जोगदंड आदी मान्यवर उपस्थित होते. संविधान प्रस्ताविकेचे वाचन, पुस्तक प्रदर्शन व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त योजनांची माहिती देण्यात आली.

गायक विष्णु शिंदे, अनिरुद्ध वनकर व विकास राजा यांच्या शाहिरी जलसाला अनुयायांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



## 'माझे जीवन गाणे' पुस्तकाचे वणी येथे प्रकाशन

**वणी :** सेवानिवृत्त मुख्याध्यापक आणि श्री जैताई मंदिर नगर वाचनालयाचे अध्यक्ष माधवराव सरपटवार यांना जैताई मातृगौरव पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला. याच वेळी त्यांच्यावरील 'माझे जीवन गाणे' या पुस्तकाचे थाटात प्रकाशन झाले.

कार्यक्रमास शैलेश पांडे, प्रदीप दाते, आशुतोष शेवाळकर, संजीव रेड्डी बोद्कुरवार, डॉ. सौरभ बरडे, स्वानंद पुंड, सुनील ठाकरे व विजय चोरडिया उपस्थित होते.

ग्रंथाची निर्मिती शैलेश व शर्वरी सरपटवार, राम व शिल्पा बीडकर यांनी केली असून विदर्भ साहित्य संघ, वणी शाखा यांनी प्रकाशित केला आहे. पुस्तकात अनेक साहित्यिक, समाजसेवक व मित्रपरिवाराचे लेख व काव्यरचना समाविष्ट आहेत.

कार्यक्रमाचे संयोजन सागर मुने यांनी केले. प्रास्ताविक प्रा. स्वानंद पुंड यांनी मांडले, तर आभार प्रा. चंद्रकांत अणे यांनी मानले.

## सम्राट बुद्धविहार अग्ने ले आउट येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा



**नागपूर :** धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त प्रमुख वक्त्या प्रा. माधुरी गायधनी दुपटे व कार्यक्रमाच्या अध्यक्षा निकोसे यांचे हस्ते तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात देशभ्रतार यांचे हस्ते धम्मध्वजारोहन करून करण्यात आली. याप्रसंगी 'निर्मिली जना मनात' हे समूहगीत सोंडवले ताई, स्नेहल पाटील व गुढे यांनी गायले. सुभाष सुखदेवे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मुख्य वक्त्या प्रा. माधुरी दुपटे यांनी आपल्या मार्गदर्शनात त्या ओबीसी समाजातून बुद्ध धम्माकडे कशा आल्या या संदर्भातील प्रवास वर्णन विदित केले. हा प्रवास करत असतांना धम्मा बद्दलची जागरूकता त्यांनी विषद केली. डॉ. बाबासाहेबांच्या 22 प्रतिज्ञेचा उल्लेख करीत त्या म्हणाल्या, डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला बुद्धाचा धम्म देऊन एका वेगळ्या किनाऱ्यावर आणले. तो किनारा आपल्या प्रगतीचा समृद्धीचा आहे असे असतांना आम्ही अजूनही जुन्या धर्माला व प्रथा परंपरांना चिकटून असू तर आम्ही डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची प्रताडना करतो. हा डॉ. बाबासाहेबांचा अपमान आहे. आपल्या समाजानी पुनःश्च यावर नक्कीच विचार करावा व स्वतःत सुधारणा करावी. यासाठी त्यांनी लग्नातील हळद, जोडवी, नवऱ्या मुलाच्या पाया पडणे, मंगळसूत्र अशी उदाहरणे देत त्या प्रथा कश्या चुकीच्या आहेत ते स्पष्ट केले. आपण स्वतःला बौद्ध म्हणत असाल तर त्याप्रती जागरूक आणि प्रामाणिक असायला पाहिजे. अध्यक्ष पदावरून बोलताना कुंदा निकोसे म्हणाल्या, डॉ. बाबासाहेबांमुळे आपल्या समाजाची प्रगती झाली आणि आज आपण या ठिकाणी बसून बोलू शकतो. वक्त्यांनी फार सुंदर व प्रबोधनात्मक मार्गदर्शन केलेले आहे. हा आपल्याला बोलण्याचा अधिकार संविधानाची देण आहे.

वक्त्यांचा परिचय इंजि. ए. के. पाटील यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन ताराचंद चव्हाण तर आभार गोपीचंद रामटेके यांनी मानले. धम्म पालन गाथेनंतर फराळ वितरणाने कार्यक्रमांची सांगता झाली.

## आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर अॅण्ड लिटरेचर तर्फे, संवाद स्टडी सेंटरचे उद्घाटन



**नागपूर :** आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर अॅण्ड लिटरेचर नागपूर तर्फे, 27 पंचतारा हाउसिंग सोसायटी, डि पी रोड, न्यु मनिष नगर नागपूर इथे सामाजिक उपक्रम म्हणून संवाद स्टडी सेंटर सुरु करण्यात येत आहे, स्टडी सेंटर करिता मोजक्या जागा उपलब्ध आहेत, स्पर्धा परिक्षेची तयारी करित असलेल्या किंवा पदव्युत्तर परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल, शिवाय पदविधर व इतरही विद्यार्थी प्रवेशाकरिता निर्धारीत प्रारुपातील अर्ज सादर करु शकतात. अर्जासोबत आधार कार्ड (छायाप्रती)ज्या परिक्षेची तयारी करीत आहात त्या परिक्षेचे विवरण, नुकतीच किंवा पुर्वी जी परिक्षा उत्तीर्ण केली आहे त्या परिक्षेची गुणपत्रीका(छायाप्रती) सहीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना प्रत्यक्ष कार्यालयात येवून उपलब्ध करता येईल. अधिक माहिती करिता 7218487177 / 9423153321 किंवा 9359257823 या क्रमांकावर संपर्क साधावा असे संस्थेतर्फे सचिव डॉ. मच्छिंद्र चोरमारे यांनी कळविले आहे.

## महत्वाचे

### आंबेडकरी समर्पित कार्यकर्ता गौरव पुरस्कार



**नागपूर :** समता सैनिक दलाचे स्मृतिशेष संघटक अॅड. विमलसूर्य चिमणकर यांच्या पाचव्या स्मृती दिनाच्या निमित्ताने दि.30 सप्टेंबर ला डॉ. आंबेडकर सांस्कृतिक सभागृह, उरूवेला कॉलनी, नागपूर येथे कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात मध्य प्रदेश येथील प्रसिद्ध लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. शीला दांडगे यांना आंबेडकरी समर्पित कार्यकर्ता गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या शिवाय 'महाबोधी महाविहार आंदोलन आणि अनुयायांची भूमिका' या विषयावर समता सैनिक दलाचे विद्यमान केंद्रीय संघटक मार्शल सुनील सारीपुत्त यांचे अध्यक्षतेखाली आयोजित परिसंवादात भंते धम्मशिखर, अॅड. प्रकाश दार्शनिक, डॉ. सिध्दार्थ मेश्राम, इंजि. अरविंद गेडाम, अशोक बोंदाडे, किशोर चहांदे यांनी आपले विचार मांडले.

### सत्यशोधक भुलबाई परिवर्तनवादी गाणी प्रकाशित



**यवतमाळ :** सत्यशोधक भोंडल्याच्या कार्यक्रमाचे आयोजन व त्यानिमित्ताने सत्यशोधक भुलबाई परिवर्तनवादी गाणी व चळवळीची गाणी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राध्यापक तोष्णा मोकळे साहित्यिक तसेच उद्घाटक डॉ. शिल्पा पोलपेल्लीवार उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ, यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला महिलांचा उत्साह व आनंददायी प्रतिसाद मिळाला.

### युथ फॉर रिवोलुशन ग्रूप द्वारे एक प्रश्न एक उत्तर व एक पुस्तक मोफत उपक्रम



**नागपूर :** युथ फॉर रिवोलुशन ग्रूप द्वारे अशोक विजयादशमीच्या निमित्ताने आण्णाभाऊ साठे चौक दीक्षाभूमी इथे एक प्रश्न एक उत्तर आणि एक पुस्तक मोफत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मागील 09 वर्षांपासून असे उपक्रम करण्यात येत आहे. यावर्षी प्रमुख पाहुणे म्हणून नितीन राऊत (आमदार, माजी मंत्री महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. तसेच या प्रसंगी प्रामुख्याने बी. जी. कोळसेपाटील (समाज सुधारक व मुंबई उच्च न्यायालय चे पूर्व न्यायाधीश उपस्थित होते. दीक्षाभूमीला येणाऱ्या अनुयायांनी या उपक्रमाचा भरपूर लाभ घेतला. तसेच या कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता ज्या ग्रूपच्या सदस्यांनी परिश्रम केले, त्यामधे सम्यक वाटचाल संघटनाचे अध्यक्ष पवन नगराले, युथ फॉर रिवोलुशन ग्रूपचे अर्चना राऊत, चंदा वानखेडे, मच्छिंद्र गायकवाड, जितेंद्र गायकवाड, अतुल देशभ्रतार, सागर बागडे, गजानन पानतावणे, मयूर गायकवाड, आकाश खोब्रागडे, सुबोद बोदले, स्वप्निल गायकवाड, अश्वजीत पाटील, सतीश भासारकर, अरुण वानखेडे आदी.

### त्रिरत्न बौद्ध महासंघाचे निवासी धम्म शिबिर



**नागपूर :** श्रीरत्न बौद्ध महासंघ केंद्रसुखावती नागपूर तर्फे दिनांक 18 ऑक्टोबर ते 24 ऑक्टोबर 2025 पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, लुंबिनी सेलिब्रेशन हॉल, उटी, उमरेड रोड येथे निवासी धम्म शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे. शिबिराचा विषय महामंगलसूक्त हे असून शिबिराचे नेतृत्व धम्मचारी रत्न सिद्धी हे करणार आहेत. 100 व्यक्तींसाठी असल्याने रुपये पाचशे नोंदणी शुल्क आहे. शिबिर दि. 18/10/2025 ला सायंकाळी सुरू होईल. शिबिरात पूर्ण कालावधीत राहणे अनिवार्य आहे. 14 वर्षाखालील व्यक्ती शिबिरात परवानगी नाही, लेखन साहित्य, औषधी, ब्लँकेटच्या दरी व टॉर्च सोबत आणावे. शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे सुंदर निसर्गरम्य परिसर, ध्यान, चलित ध्यान व पूजा घेण्यात येईल, राहण्याची उत्तम व्यवस्था, धम्म प्रवर्तन व गटचर्चा घेण्यात येईल. अधिक माहितीसाठी संपर्क धम्मचारी कुलचंद्र-9890066985, धम्मचारी आर्य कीर्ती-9922731902

## संघरत्न बुद्ध विहारात प्रमोद मुन यांचे व्याख्यान



**नागपूर :** वर्षावास निमित्ताने व्याख्यान मालिका संघरत्न विहारांमध्ये सुरू करण्यात आलेली आहे. व्याख्यान क्र. 13, दि. 4 ऑक्टोबर 2025 ला संघरत्न विहारात घेण्यात आले. व्याख्याता म्हणून प्रमोद मून लाभले तर अध्यक्ष म्हणून चरणदास लांजेवर उपस्थित होते. वक्ता म्हणून छाया ढोक यांनी आपले विचार मांडले. प्रमोद मुन आपल्या भाषणात बोलले की भारतीय राज्यघटनावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी म्हटले की, डॉ. बाबासाहेबांनी दिलेली राज्यघटना ही आजच्या वर्तमान सरकारमध्ये कशा पद्धतीने उपयोगात येत आहे व लोकशाहीला वाऱ्यावर ठेवून हुकूमशाही कशा पद्धतीने अमलात आणल्या जात आहे. लोकशाहीची पायमल्ली होऊन आम्हाला आमचे अधिकारापासून कसे वंचित ठेवल्या जाते याबद्दल बोललेत व बुद्धाचा धम्म व संघ याची आजच्या काळात काय गरज आहे व बुद्ध विहारांमध्ये बुद्धांनी सांगितलेली विचार कशा पद्धतीने त्याचा प्रचार व प्रसार व्हायला पाहिजे आणि ते लोकांपर्यंत पोहोचायला पाहिजे याबद्दल सविस्तर माहिती मुन यांनी विस्तृतपणे सांगितलेली आहे. तसेच छाया ढोक यांनी सुद्धा आपल्या भाषणामध्ये विहारातल्या दैनंदिनी बद्दलची माहिती सांगून पुढे आम्ही विहारांमध्ये कशा पद्धतीचे कार्यक्रम राबविणार याबद्दल सविस्तर माहिती सांगितलेली आहे. तसेच अध्यक्ष म्हणून लाभलेले आदरणीय चरणदास लांजेवर बोललेत की, डॉ. बाबासाहेब सयाजीराव गायकवाडच्या दरबारी गेल्यानंतर त्यांना कोणत्या बातम्या मिळाल्या व सयाजीराव गायकवाड यांनी त्यांची कशी मदत केली. प्रदेशात जाण्याकरिता याबद्दलची माहिती तसेच सयाजीराव गायकवाड यांची त्यांना कशी मदत झाली. डॉ. बाबासाहेबांचा संघर्ष कसा होता, आम्ही सुद्धा या वर्तमानामध्ये त्यांच्या संघर्षाची आठवण ठेवून पुढची पाऊलवाट कशा पद्धतीने करायला पाहिजे, याबद्दलची माहिती आपल्या भाषणातून त्यांनी दिली. संचालन ज्योती आवळे यांनी केले तर आभार प्रदर्शन विनोद मून यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता निर्मला लांजेवार, शोभा खडसे, चरणदास लांजेवार, मून, सुचित्रा धनविजय, धनश्री पाटील, अंजनाबाई सुटे, माया गायकवाड, रमा मून, मंगला रामटेके, प्रतिभा डोंगरे, डिंपल गजवी, प्रदीप धनविजय, बागेश्वर संभाजी डांगे, सुरेश कांबळे, गुणवंत कोसारे, अश्विन कांबळे, सोनू खडसे, पंकज ढोक, पूर्णिमा गावंडे, रोशनी भगत, शारदा कांबळे, विशाखा कांबळे इत्यादींनी परिश्रम घेतले.

## महाजनवाडीत समाजप्रबोधनाने धम्मचक्र प्रवर्तनदिन साजरा



**हिंगणा :** वानाडोंगरी नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या महाजनवाडी बस स्टॉप परिसरातील साहिल फोटो स्टुडिओ समोरील मैदानात समाजप्रबोधनाने धम्मचक्र प्रवर्तनदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संविधान अभ्यासक तलाठी विनोद खोब्रागडे होते. तर महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध प्रबोधनकार गायक संविधान शेंडे, सुप्रसिद्ध गायिका निशा धोंगडे, सामाजिक कार्यकर्ते, केशव डोंगरे, तेजराव मुन, सुरेश मानवटकर, रमेश कनेरे, महानंदा पाटील, बालु मोरे, मुन्नाभाऊ दहाट, ज्येष्ठ पत्रकार विनायक इंगळे व गजानन ढाकुलकर उपस्थित होते. सर्वप्रथम महामानवांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलीत करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संविधान अभ्यासक विनोद खोब्रागडे यांनी दीक्षाभूमी, अंबाझरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व भिमा कोरेगांव या जागा अजुनही पुर्णपणे समाजाला मिळाल्या नाहीत. तसेच महाबोधी महाविहाराचा ताबा सुद्धा इतरांच्या हातात आहे आणि या सर्व समस्यांना वाचा फोडायची असेल तर समाजबांधवांनी एका झेंड्याखाली एकसंघ होणे काळाची गरज आहे. असे अभ्यासपुर्ण मनोगत तलाठी विनोद खोब्रागडे यांनी व्यक्त केले. मार्गदर्शनानंतर प्रबोधनकार संविधान शेंडे व गायिका निशा धोंगडे यांनी प्रबोधनासह गितांच्या माध्यमातून उपस्थितांचे प्रबोधन केले. संचालन तृषा मेश्राम, प्रास्ताविक सामाजिक कार्यकर्ते व सैनिक केशव डोंगरे तर आभार विनायक इंगळे गुरुजी यांनी मानले. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक देवेंद्र डोंगरे व मंगेश मेश्राम होते. तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशाल कांबळे, सोनु मेश्राम, आशिष वाकडे, सुशिल खडसे, अनिल नगराळे व समता सैनिक दलाच्या सैनिकांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी भोजनदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## प्रतिबिंब हे क्रांतीसूर्याचे बुद्ध भीम गीतांचा कार्यक्रम सादर



**नागपूर :** 69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ग्लोबल वेलफेअर असोसीएशन नागपूर यांच्या वतीने नागपूर दुरदर्शन सह्याद्री फेम, टि. सीरीज कॅसेट सिंगर व वामनदादा कर्डक संगीत साहित्य अकादमी, भुसावळ पुरस्कृत प्रसिद्ध गायक प्रा. विजयकुमार पाटील आणि संच यांच्या 'प्रतिबिंब हे क्रांतीसुर्याचे' बुद्ध व भीम गितांचा प्रबोधनपर संगीतमय कार्यक्रम नागपूर येथील लोकमत चौक, लोकमत भवनच्या परिसरात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात संचातील गायिका सविता हिच्या 'शांती दूताच्या वैभवशाली जावूनी या आश्रमा' या बुद्ध गीताने झाली. त्यानंतर संचाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाटील यांनी 'माणूस तू केला, वंचित मानव माणुस तू केला, भीमराया माणसाचा तूला मुजरा हा पहिला', हे भीम गीत सादर करताच उपस्थित भीम अनुयायांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. तद्नंतर संचातिल कलावंत विवेक निमगडे यांनी 'पहा.. पहा.. मंजूळ हा माझा भिमरायाचा मळा', विजय रामटेके यांनी 'भीमरायांने देशावरती प्रेम अलौकीक केले इतिहासाचे पान रंगवून ते गेले.' हे गीत सादर केले. उपस्थित अनुयांयानी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यानंतर इतर बुद्ध - भीम गीते.. 'मानवता के हक्क दिलवाकर जीवन का जो दान दिया, वो बात करो पैदा .. तुम अपनी जुबांनो पे', 'छाती ठोक सांगू जगाला असा विदवान होणार नाही.', 'डोंगर झाडी हाक तू गाडी नाही तूला र. ठाव, बघ जरा पूढे कस शोभून दिसतय माझ्या भीमाच गांव' ही गिते देखील सादर करण्यात आली. गायक कलावंताना किबोर्डवर कल्याण खोब्रागडे, ऑक्टोपॅडवर योगेश हिवरारे व ढोलकी वर ज्ञानेश्वर हिवरारे या दोन्ही बंधूनी साथसंगत केली. तेवढ्या जोमाने विजय मधुमटके यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. उपस्थित प्रेक्षकांनी या प्रबोधनपर कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता ग्लोबल वेलफेअर असोसीएशन नागपूरच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले.

## आदिवासी समाजाने केली महात्मा रावणाची पूजा



**कुरखेडा :** एकीकडे दसऱ्याला महात्मा रावणाचा दहन केला जातो तर दुसरीकडे आदिवासी समाज आपला पूर्वज म्हणून महात्मा रावणाची भक्तिभावाने पूजा अर्चना करीत असतात. कुरखेडा तालुक्यातील मालदुगी गावात दरवर्षीप्रमाणे पहांदि पारी कुपार लिंगो गोंडी धर्म महासंघच्या वतीने घटस्थापनेला रावणाच्या प्रतिमात्मक पुतळ्याचे प्रतिष्ठापना करून दसऱ्यापर्यंत भक्तीभावानी पूजा करीत असतात. याही वर्षी दसऱ्याला महात्मा रावणाची भक्तीभावाने पूजा करून महागोंगो करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगला वरखडे, प्रमुख पाहुणे सरपंच आकांक्षा नेताम, रमेश कोरचा, प्रभाकर जुमणाके, माजी सरपंच कुसन तुलावी, ग्रा. स. प्रेमदास सहारे, शितल मडावी, उषा गाथे, लिलाधर नैताम, बंडु राऊत, गुरुदेव कोल्हे, ऋषी कुंजाम, मुकेश तुलावी, मनिषा कुंजाम, घनश्याम नैताम, परसराम हरामी, पुजारी श्रीराम नैताम, आदी उपस्थित होते.

सर्वप्रथम महात्मा रावणाच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे महागोंगो करण्यात आले. नंतर सरस्वती तुलावी, अंजना नैताम यांच्या हस्ते कोयापुनेम ध्वजारोहण करण्यात आले.

प्रमुख पाहुणे प्रेमदास सहारे मार्गदर्शन करतांना म्हटले, महात्मा रावणाला काही परंपरांमध्ये वाईट किंवा दुष्ट प्रवृत्तीचा म्हटल्या जाते. परंतु आदिवासी समाज अनादी काळापासून रावणाची पूजा करतो. अनेक भागात रावणाची राव, राव पेन, रावेन पुरखा असा उल्लेख करून आपला आराध्य म्हणून पूजा केली जाते. आदिवासी भागात रावणाची अनेक मंदिरे आहेत. मेळघाट भागात कोरकू आदिवासी रावण आणि मेघनानाची पूजा करतात. त्यांच्या लोकगीतामध्ये रावणाच्या पराक्रमाचा उल्लेख केला जातो. रमेश कोरचा मार्गदर्शन करताना म्हटले, हिंदू धर्म ग्रंथात, पुरानात रावणाचे वर्णन करताना रावण अनेक विषयात निपुण विद्वान प्रचंड पंडित असे करण्यात आले आहेत. असे असताना 1969 मध्ये नागपूर येथे रावण दहनाला सुरुवात केली. आज ही प्रथा संपूर्ण भारतात पसरलेली आहे. रावण दहन प्रथेमुळे आज आदिवासींच्या धार्मिक भावना मोठ्या प्रमाणात दुखावल्या जातात. त्यामुळे रावण दहन प्रथा बंद करावी असे आवाहन केले. अध्यक्ष स्थानावरून मंगला वरखडे संबोधित करताना म्हटले, आज संपूर्ण भारतात महात्मा रावणाच्या नावाने अनेक गावांची नावे आहेत. आदिवासी भागात मुलांची नावे महात्मा रावणाच्या नावाने ठेवतात. वेगवेगळ्या राज्यातील समुदायांमध्ये रावणाला ग्रामदेवतेच्या रूपाने पुजतात. गावाच्या रक्षणासाठी निसर्गाकडे, रावपेनकडे आर्जव करतात. असे असताना महात्मा रावण हा दुष्ट प्रवृत्तीचा कसा? इतर समाजाने रावण दहन करू नये. आदिवासी समाजाच्या दैवताच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन थांबवावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन नंदकिशोर नेताम यांनी केले तर आभार मयुरी तुलावी हिने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कैलास नैताम, सुनंदा मडावी, अमित तुलावी सावन नैताम, संजय तुलावी, पंकज तुलावी, हेमराज धुर्वे, सुषमा नैताम, दर्पणा कोरचा, मीरा तुलावी यांनी केले. कार्यक्रमाला गावातील व आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648